
# ी साईलीला

सप्टेंबर १९५९

卐

किंमत १० आणे (६२ न.पैसे)



शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक



# श्री साई लीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३६ वें : अंक ६ वा

सप्टेंबर १९५९

संपादक—

नागेश आत्माराम सावंत

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. २५१२७४

कार्यालय—

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,

४९/५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

## चालू अंकांत—

* साईबाबांचे एक महान् भक्त काका दीक्षित यांचें चरित्र.
* लहान मुलांच्या वर्तनाची मार्गदर्शक मीमांसा.
* शवांच्या शापांच्या अद्भुत सत्यकथा.
* श्रीरामकृष्णांच्या सहवासांत.
* योगिराज श्री बंसुरिया बाबा.

आणि इतर वेंचक व वाचनीय साहित्य.

★



# प्रिय वाचक—

श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठीं शिरडीस प्रत्यहीं शेंकडों भक्त दूरदूरच्या ठिकाणांहून येत असतात. या भक्तांच्या प्रीत्यर्थ शिर्डी संस्थान समितीनें अनेक सोयी उपलब्ध करून ठेवल्या आहेत. भक्तांना राहण्यासाठीं अनेक खोल्या बांधल्या आहेत; त्यांच्या स्नानादिकांची चांगली व्यवस्था केली आहे; गर्दीमुळें समाधिमंदिरांत गोंधळ उडूं नये आणि सर्वांना व्यवस्थित रीतीनें पूजा-अर्चा करतां यावी, यासाठीं कांहीं शिस्त लावून दिली आहे. या सोयी करण्यामागें एकच उद्देश आहे. तो हा कीं, आलेल्या भक्ताला बाबांचें निवांतपणें व सहज रीतीनें दर्शन घडावें आणि गैरसोयींनीं त्याचें मन व्यग्र न राहातां त्याला विवेंध मनानें बाबांचें भजन-चिंतन करतां यावें.

पण पुष्कळ भक्त बाबांच्या दर्शनासाठीं येण्याचा आपला प्रमुख हेतु विसरून जातात आणि आपल्या सोयी-गैरसोयींच्या विचारांतच गढून जातात. इतक्या गर्दींत कधीं कधीं एखाद्या भक्ताची गैरसोय होणें हें अपरिहार्य असतें. मग असा भक्त आपल्या तक्रारी गैरसोयीकडे दुर्लक्ष न करतां जोराजोरानें तक्रार करूं लागतो आणि संस्थान समिति भक्तांच्या सोयींकडे अगत्यानें लक्ष पुरवीत नाहीं, असा एकदम निष्कर्ष जाहीर करून मोकळा होतो. ह्या अशा तक्रारींना दर वेळीं उत्तरें देत राहाणें हें अशक्यप्रायच आहे. तक्रारखोरांचे शब्द मुकाट्यानें सहन करणें आणि भक्तांची व्यवस्था अधिकाधिक चांगल्या रीतीनें ठेवण्याची कसोशी करणें, एवढेंच संस्थान-समितीच्या हातीं उरतें.

अशा परिस्थितींत संस्थानच्या एकंदर व्यवस्थेविषयीं एखाद्या नवीनच आलेल्या आणि पूर्वग्रहरहित अशा यात्रेकरूनें व्यक्त केलेलें मत आढळलें म्हणजे संस्थानचें कार्य योग्य त्या मार्गानें चालू असल्याची खात्री पटते.

मुंबईला 'रहस्य-रंजन' नांवाचें, प्रामुख्यानें रहस्यकथांना वाहिलेलें एक लोकप्रिय मासिक निघतें. या मासिकांत 'रंजूचें पान' या नांवाचें एक विविध विषयांवरील वैशिष्ट्यपूर्ण सदर चालविलेलें आहे. मासिकाचें संपादक श्री. ना. वि. काकतकर हे स्वतः हें सदर लिहितात कीं दुसऱ्या कोणाकडून तें चालविलें जातें हें आम्हांला माहीत नाहीं. येत्या मे महिन्याच्या रहस्य-रंजनच्या अंकांत या सदरामध्यें शिरडीचा उल्लेख सहज पाहाण्यांत आला, शिरडीस येणाऱ्या भक्तांच्या दृष्टीनें हा उल्लेख मार्गदर्शक ठरण्यासारखा आहे.

म्हणून तो आम्ही पुढें उद्धृत करीत आहोंत. लेखक म्हणतो,

'परवां शिरडीला जाण्याचा अचानक योग आला. मी स्वतः साईबाबांचा शिष्य नाहीं. साईबाबा नि त्यांचें कार्य याबद्दल मला इथें कांहीं लिहायचें नाहीं. पण या भेटींत मला जें जाणवलें तेंच मला सांगावेंसें वाटतें. म्हणून मी या सफरीचा उल्लेख केला आहे. आपली यात्रेचीं जीं ठिकाणें आहेत त्या ठिकाणीं बुवाबाजी नि बडवेगिरी यांचा नेहमींच सुकाळ दृष्टीस पडतो. उत्तर भारतापेक्षां दक्षिण भारतांत हें प्रमाण थोडे कमी आहे एवढेंच.'

पण नेमकी हीच गोष्ट मला शिरडीला आढळली नाहीं. त्यामुळें खरोखर फार समाधान वाटलें. दर्शनासाठीं कुणाचा हात दाबावा लागत नाहीं कीं हार चढविण्यासाठीं पुजाऱ्याची मूठ दाबावी लागली नाहीं. साऱ्या गोष्टी अगदीं सहज घडत होत्या. खुषीनें घडत होत्या. इथें कशाचीच सक्ती नव्हती. वागणुकींत ताठा नव्हता सौजन्य होत."

यावर आम्ही अधिक कांहीं लिहिण्याची जरुरी नाहीं.

—संपादक






संकलक : आमचे प्रतिनिधि

**श्री. श्री. बा. देव ( बाबांच्या बाळाचें बाळ ), वकील, ठाणें, हे लिहितात—**

दि. २३ जुलै १९५९ रोजी, मी माझे एक पक्षकार यांच्याबरोबर त्यांच्या एका कोर्टाच्या कामाकरितां मुंबईहून मुलुंडला जावयास निघालों. मुंबईहून एक टॅक्सी केली. तिचा नंबर BMR ३७८०, टॅक्सींत श्रीसाईनाथांचा फोटो लाविलेला होता. आम्ही साधारण कुर्ल्यापर्यंत आलों. माझ्या पक्षकारानें मला बाबांच्या विषयींची माहिती व अनुभव विचारण्यास सुरुवात केली व मीही त्यांना ती माहिती देत होतों. इतक्यांत आमच्या टॅक्सीचे ड्रायव्हर श्री. शिंदे अनंत बाबुराव ('ए' ब्लॉक, खोली नं. २८, आंबेवाडी, गिरगांव, मुंबई ४.) हे आम्हांला म्हणाले कीं, "मी ही बाबांचा भक्त आहे व बाबांच्या भक्तमंडळाचा आजीव सभासद आहे. माझी बाबांच्यावर श्रद्धा जडण्याचें कारण खालीलप्रमाणें—मला कुत्र्यांचा फार शोक. एकदां त्यांपैकीं एका कुत्रीच्या पोटांत पाणी झालें. मी तिला दवाखान्यांत घेऊन गेलों व डॉक्टरांनीं सांगितलेले सर्व उपाय केले. माझे पैसे खर्च झाले पण कुत्रीला बरें वाटेना. तेथील डॉक्टरांनीं कुत्री परत घेऊन जावयास सांगितली; घरींही तिला बरें वाटण्याची लक्षणें दिसेनात. पुन्हां मी डॉक्टरांना विचारावयास गेलों त्यावेळीं त्यांनीं मला सांगितलें कीं कुत्री सुधारण्याची आशा नाहीं. तूं आमच्याजवळ ५ रु. आणून दे म्हणजे आम्ही तुझ्या कुत्रीला इहलोकांतून नाहींशी करतो. त्यांचे ते शब्द ऐकून माझ्या मनाला फार वाईट वाटलें कीं, ज्या कुत्रीला मुलीप्रमाणें आत्तांपर्यंत वाढविलें, तिला आपल्या हातानें यमलोक दाखवावयाचा काय ? मीं ताबडतोब सांगितलें कीं मी स्वतः त्या कुत्रीला ह्या कामाकरितां तुमच्या ताब्यांत कधींही देणार नाहीं. मला जितकी तिची शुश्रूषा करतां येईल तितकी करीन. व इतकें झाल्यानंतर मी बाबांची कीर्ति ऐकली व त्यांना नवस केला. त्यांची उदी तिला पाजली व काय आश्चर्य कीं तेव्हांपासून त्या जीवाला बरें वाटूं लागलें. व अजूनपर्यंत ती कुत्री टुणटुणीत माझ्या घरीं आहे व त्यानंतर मी शिर्डी संस्थानचा आजीव सभासद झालों; मी जो नवस केला तो फोर्जेट स्ट्रीटवर, जें बाबांचें मंदीर आहे तेथें.'

## बाबा भोजनास आले !

**श्री. शंकर हरि वैद्य ( रत्नागिरीकर ) हे लिहितात :—**

ईश्वर जवळ आलेला असूनहि माणसाला तो ईश्वरच आहे हें ओळखतां येत नाहीं, हें मी आपणांस माझ्या स्वानुभवानें सांगत आहे.

आमच्या येथें दरसाल दत्तजयंत्युत्सव होत असतो. उत्सव मोठ्या प्रमाणांत होत असून दत्तजन्म, कथा कीर्तन व दुसरे दिवशीं महा–प्रसाद होत असतो. अशा एका उत्सव–प्रसंगीं माझे गुरू परमपूज्य तीर्थस्वरूप मुकुंद बाबीशेट नार्वेकर हे आले होते. त्यावेळीं आमच्या गच्चीवर सुंदर रीतीनें मंडप शृंगारला होता. व दत्तमहाराजांची उत्सव मूर्तीहि ठेविली होती. दुपारीं १२ वाजल्यापासून रात्रीं ८ वाजेपर्यंत सर्वांना महाप्रसाद वाटण्यांत येतो. सदर दिवशीं साधारणतः सकाळीं ९–९॥ वाजतां एक ५०।६० वर्षें वयाचे अनोळखी व साध्या पोषाखांतील ब्राह्मण गृहस्थ आम्हीं बसलों होतों त्या ठिकाणीं आले. मी त्यांना म्हणालों 'बसा!' नंतर त्यांची विचारपूस मीं केली कीं, आपण कुठून आलांत व राहातां कुठें? तेव्हां ते म्हणाले कीं मी नगरकडचा असून इथें हिंदुस्थान कन्स्ट्रक्शनमध्यें नोकरीस आहें. मी त्यांना म्हटलें कीं, आतां १२ वाजतां जेवण होईल तेव्हां आपण जेऊनच जा. ते म्हणाले हरकत नाहीं. परंतु मी जरा बाहेर जाऊन बरोबर १२ वाजतां जेवावयास येतों, असें म्हणून ते निघून गेले. ते निघून गेल्यावर मी आमच्या घरच्या मंडळींना व इतर पाहुण्या मंडळींना विचारलें कीं हे गृहस्थ एकदम गच्चीवर कसे आले. व त्यांना वर माझ्याकडे कुणीं पाठविलें परंतु ह्याचें कुणालाच उत्तर देतां आलें नाहीं. महाप्रसादाला माझे परमस्नेही डॉ. नरवणे हेहि आले होते व त्यांना महत्वाच्या कामासाठीं लवकर जावयाचें होतें. म्हणून बरोबर १२ वाजतां प्रसादाला सुरवात केली. मंडळी जेवावयास बसली. मी श्री. काकासाहेब मोहिले व आणखी ३।४ माणसें जेवावयाचें थांबून सकाळीं आमंत्रण दिलेल्या गृहस्थांची वाट पहात बसलों. बरोबर १२ वाजतां जेवावयास येतों असें ३।४ वेळां बजावून त्यांनीं सांगितलें असल्यामुळें आम्हीं त्यांचा आजुबाजूला शोध करविला. परंतु ते कांहीं आढळले नाहींत. योगायोग असा कीं बरोबर १२ वाजतां माझ्या सौभाग्यवती पार्वतीबाई नैवद्याची ३ ताटें घेऊन देवांना नैवेद्य दाखविण्याकरितां आमच्या देवघरांत गेल्या. (१) आमचे कुलदैवत श्रीसोमेश्वर व कुलस्वामिनी श्रीनवलादेवी (२) श्री. दत्तराज माउली व (३) श्री. समर्थ साईनाथ माउली. असें ते ३ नैवेद्य होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे श्री साईनाथ माउलीचा जो नैवेद्य होता तो नैवेद्य दाखवितांना अर्धा झाला! पानावरील सर्व अन्नाच्या प्रकारांचा फक्त अर्धा अर्धा हिस्साच राहिला! हें पाहून आम्हां सर्वांना जो आश्चर्ययुक्त आनंद झाला, त्याला पारावारच उरला नाहीं. प्रत्यक्ष बाबाच जेवून गेले हीच आमच्या अंतःकरणाची भावना झाली व ती खरीच आहे, असें आमच्या मनानें घेतलें आणि सकाळीं प्रत्यक्ष बाबा घरीं आले असतांना आम्हीं त्यांच्या पायावर डोकें ठेवलें नाहीं किंवा त्यांना तीर्थप्रसाद दिला नाहीं ह्याचा आम्हांला पश्चात्ताप झाला. परंतु माझी पूर्ण खात्री आहे कीं बाबा आम्हांला पुन्हा दर्शन दिल्याशिवाय राहाणार नाहींत. फक्त त्यांना ओळखण्याची दृष्टि आम्हांस आली पाहिजे व हीच आमची बाबांकडे प्रार्थना आहे.

# भक्तवर काका

लेखक : नागेश वासुदेव गुणाजी

## गोविंद सीताराम दीक्षित

( इ. स. १८६४–१९२६ )

श्रीसाईबाबांचे अनेक श्रेष्ठभक्त होऊन गेले. त्यामध्यें कै. हरि सिताराम दीक्षित हे फार उच्च कोटीचे भक्त होते. अनेक कसोट्या लावून त्यांची श्रीसाईबाबांनीं परीक्षा घेतलेली होती. त्या सर्वांतून ते यशस्वीपणें उत्तीर्ण झाले होते. त्यामुळें ते बाबांचे प्रिय भक्त होते हें सांगणें न लगे. श्रीसाईसच्चरिताच्या प्रारंभीं त्यांनीं जो सुंदर उपोद्घात लिहिला आहे, तो वाचला असतां त्यांची योग्यता कळून येते.

त्यांच्या निधनानंतर शिरडीस संस्थान कमिटीच्या व भक्तमंडळाच्या ता. २५।७।२६ रोजीं ज्या सभा झाल्या, त्यांत त्यांच्यासंबंधीं दुःखवट्याचा ठराव एकमतानें मंजूर झाला; त्यावरून त्याची योग्यता सर्वांना कशी स्पष्ट दिसत असे हें स्पष्ट होतें. तो ठराव असाः—

"आपणांपैकीं, आपणा सर्वांस परमपूज्य असलेले श्रीसद्गुरुसाईनाथमहाराजांचे निस्सीम भक्त श्री. हरि सीताराम ऊर्फ काकासाहेब दीक्षित दीक्षीत हे ता. ५ जुलै १९२६ सोमवार रोजीं एकाएकीं कैलासवासी झाले. त्यांच्या मृत्यूमुळें भक्तमंडळींतील एक उत्साही, अनुभवी, एकनिष्ठ व स्वार्थत्यागी भक्त नाहींसा झाला, याबद्दल सर्व भक्तमंडळास अतिशय दुःख होत आहे. श्री. काकासाहेबाच्या निधनामुळें श्रीशिरडी-संस्थानचें अपरिमित नुकसान झालें आहे. कै. काकासाहेब हे आपल्या संस्थानचे आत्मा होते. श्रीशिरडी–संस्थान स्थापन झाल्यापासून ते त्या संस्थानचे चिटणीस होते, व तें काम त्यांनीं आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत अतिशय समाधानकारक रीतीनें केलें. आज शिरडी संस्थानला जें स्वरूप आलें आहे, त्याचें श्रेय सर्वांशीं काकासाहेबांकडे आहे. त्यांच्या मृत्यूमुळें जशी आपली तशीच त्यांच्या कुटुंबाचीहि फार मोठी हानि झाली आहे व त्यांच्या कुटुंबाला झालेल्या दुःखांत सदरचें भक्तमंडळ पूर्ण भागीदार आहे.'

महासमाधि घेतांना किंवा घेण्यापूर्वी श्री. साईबाबांनीं कोणालाहि आपला

शिष्य किंवा गादीचा वारस करून ठेविला नाहीं. त्यामुळें त्यांच्या महासमाधीनंतर हिंदु, मुसलमान वगैरे सर्व भक्तमंडळांत बरेच तंटेबखेडे वादविवाद सुरू झाले. अशा बिकट प्रसंगीं श्री. काकासाहेब दीक्षित पुढें होऊन त्यांनीं शिरडीसंस्थानची एक घटना सर्वांच्या सम्मतीनें तयार केली आणि ती सरकार दरबारांत मंजूर करून घेतली. त्या घटनेच्या आधारावरच देशकालानुरूप फेरफार करून हल्लींची संस्थान कामिटी काम करीत आहे.

**पूर्ववृत्तांत** : जन्म, बालपण वगैरे. काकासाहेबांचा जन्म इ. स. १८६४ मध्यें खांडवा येथें वडनागर ब्राह्मण कुळांत झाला. नागर ब्राह्मण. यांची मूळवस्ति काठेवाडांत जुनागड संस्थानांत होती आणि तेथून कांहीं शतकापूर्वी कित्येक नागर कुटुंबांनीं गुजराथेंत येऊन वस्ती केली आणि कांहीं कुटुंबांनी मध्यप्रांतांत खांडवा येथें वस्ती केली. गुजराथेंत आलेल्या कुटुंबांनीं गुजराथी रीतिरिवाज, आणि मध्यप्रांतांत आलेल्या कुटुंबांनीं महाराष्ट्रीय रीतिरिवाज घेतले. नागर ब्राह्मण म्हणजे हुषार, राजकारण धुरीण, कर्तृत्ववान्, आणि उच्चवर्णीय ब्राह्मणाप्रमाणें आचारवान् ( सोवळें ओवळें पाळणारे ) असे समजले जातात.

खांडव्यास दीक्षितांचें घराणें प्रतिष्ठित व सुखवस्तु असें होतें. काकासाहेबांचे वडील बंधु राजाराम सिताराम दीक्षित हे नागपुरास कंत्राटदाराचें काम करीत होते आणि त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें संपत्ति आणि कीर्ति मिळविली. होती;त्यांना सरकारनें रावबहादूर ही बहुमानाची पदवी दिलेली होती आणि ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमलें होतें. त्यांना दोन पुत्र मोतीभाऊ व मोरुभाऊ असे होते आणि ते बॅरिस्टर झालेले होते, पण दुर्दैवानें ते अकालीं मृत्युमुखीं पडले. त्यांचे धाकटे बंधु सदाशिवराव हे बी. ए. एल्एल् बी असून कच्छ संस्थानचे दिवाण होते. काकासाहेबांची एक भगिनी खांडव्याच्या प्रसिद्ध मंडूळोई घराण्यांत दिली होती आणि त्यांचे चिरंजीव गोविंदराव हेहि बरेच लौकिकास चढले.

**शिक्षण** : काकासाहेबांच्या बालपणाविषयीं कांहीं विशेष हकीकत उपलब्ध नाहीं. त्यांचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण, खांडवा, हिंगणघाट आणि नागपूर येथें झालें. इ. स. १८७८ सालीं म्हणजे वयाच्या १४ व्या वर्षी ते नागपूर सिटी हायस्कूलमधून मॅट्रिक्युलेशन परीक्षा उत्तम रीतीनें पास झाले, व त्यांनीं दोन शिष्यवृत्त्या मिळविल्या. नंतर ते मुंबईच्या विल्सन कॉलेजांतून. पी. ई. पास झाल्यावर एलफिन्स्टन कॉलेजांत गेले व तेथून १९ व्या वर्षी बी. ए. ची परीक्षा पास झाले व त्यांतहि त्यांनीं 'धीरजलाल मथुरादास' स्कॉलशिप मिळविली. नंतर त्यांच्या एल. एल. बी. आणि सॉलिसिटर या परीक्षा

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा

पास होऊन त्यांनीं कांहीं दिवस गव्हर्नमेंट सॉलिसिटर्स लिटल आणि कंपनींत काम केलें आणि त्यानंतर त्यांनीं आपली स्वतंत्र सॉलिसीटरची पेढी उघडली.

**धंदा :** सॉलिसिटरच्या कोणत्याही चालू पेढींत तीन वर्षें उमेदवारी करून त्या पेढीला ५००० रु द्यावे लागत असत. आणि नंतर सॉलिसिटरच्या परीक्षेस बसून पास व्हावें लागत असे. या सर्व अडचणींना तोंड देऊन सॉलिसिटरची परीक्षा पास होऊन काकासाहेबांनीं आपला धंदा चालविला. त्यावेळीं,भावनगर एक्सपोझर्स, पुणें वैभवावरील राजद्रोहाचा खटला, लो. टिळक व ग्लोब, लो. टिळक व टाईम्स ऑफ इंडिया, जी. आय. पी. रेल्वे सिग्नलर्सचा संघ अशा तऱ्हेचे महत्वाचे कज्जे त्यांनी चांगल्या रीतीनें चालविल्यामुळें त्यांची चांगली प्रसिद्धि झाली, आणि जनतेकडून मान मिळाला.

**सार्वजनिक कामगिरी :** जसजसा धंद्यांत जम बसत चालला, तसतशी सार्वजनिक कामगिरी करण्याची संधि काकासाहेबांना मिळूं लागली. (१) सन १९५६ सालीं ते गिरगांव वार्डातर्फें मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशनचे लोकनियुक्त सभासद झाले. आणि ते सर फेरोजशहा मेहता यांच्या पार्टींत सामील झाले. कोणत्याहि पक्षाचा अभिमान न धरतां योग्य दिसेल तें निर्भयपणें प्रतिपादन करणें हें त्यांचें धोरण असे. कांहीं साहेब आणि सरकारी अधिकारी यांना सर मेहतांचें वर्चस्व न खपल्यामुळें त्यांच्या संघांतून हॅरिसन कॉकस मंडळीनें शिकस्त करून जस्टिस ऑफ दि पीस संघांतून सर मेहता निवडून येऊं नयेत अशी खटपट केली. आणि जेव्हां ते निवडून आले नाहींत, तेव्हां काकासाहेबांनीं आपल्या जागेचा राजीनामा देऊन त्यांना परत निवडून येण्याची संधि दिली. पण सर मेहताच्या प्रतिस्पर्ध्यांच्या निवडणुकींत कांहीं व्यंगें व दोष दिसून आल्यामुळें त्यांची निवडणूक रद्द झाली आणि सर मेहताच निवडून आले. गिरगांववॉर्डातर्फे काकासाहेबहि पुनः निवडून आले. कार्पोरेशनमध्यें काकासाहेबांची वर्तणूक सरळ व निःपक्षपाती अशी असे (२) पुढें दोन वर्षांनीं ग्रॅज्युएटसंस्थेमार्फत १८९८ सालीं ते मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो निवडून आले आणि युनिव्हर्सिटींत दाखल होऊन तेथेंहि त्यांनीं चांगलें कार्य केलें (३) या शतकाच्या आरंभीं १९०४ सालीं ते राष्ट्रीय सभेस मिळून स्वागत सभेचे एक सेक्रेटरी झाले. प्रतिवर्षी ते नेमानें राष्ट्रीय सभेच्या बैठकीस जात असत. या निमित्तानें त्यांनीं सर्व सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला आणि सहकुटुंब, हिंदुस्थानच्या काशी, रामेश्वर जगन्नाथपुरी वगैरे मुख्य यात्राहि केल्या. त्यावेळीं राष्ट्रीय सभेंत दोन पक्ष असत. सर फिरोजशहाचा मवाळ पक्ष आणि लोकमान्य टिळकांचा जहाल पक्ष. या दोन पक्षांमध्यें १९०७ सालीं तंटा भांडण झालें त्यावेळीं काकासाहेब मवाळ पक्षांत असले तरी लोकमान्य टिळकांबरोबर पत्रव्यवहार करून समेट करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना त्यांत यश आलें नाहीं. (४) १९०१ सालीं नामदार गोखले यांची सरकारच्या कायदे कौन्सिलांतील

मध्यभागातफेंची जागा मात्र रिकामी झाली आणि त्या जागेसाठीं काकासाहेब दीक्षित आणि सातारचे दादासाहेब करंदीकर हे दोघ उमेदवार होते. त्यांत काकासाहेबांनाच यश मिळून ते नामदार झाले. त्यांची कौन्सिलांतील कारकीर्द त्यांच्या बाणेदारवृत्तीला साजेल अशीच निर्भीडपणाची झाली. पोलिस ॲक्ट कमिटीवरचें काम, लॅन्ड रेव्हिन्यु कोडाची दुरुस्ती इत्यादि विषयीं त्यांनीं चांगली कामगिरी करून चांगला लौकिक संपादन केला.

**गृहस्थाश्रम** : येथपर्यंत काकासाहेबांच्या सार्वजनिक कामगिरीचें वर्णन झालें. आतां त्यांचा गृहस्थाश्रम कसा होता हें पाहूं. त्यांचा गृहस्थाश्रमहि असाच उज्ज्वल होता. अतिथिसत्कार व 'सर्वभूतीं समदृष्टि' हे दोन त्यांचे विशेष गुण होते. त्यांचें स्नेहीमंडळहि फार मोठें होतें. काकासाहेबांच्या घरीं पाहुणे नाहींत असा क्वचितच दिवस जात असे. एखाद्या दिवशीं पंक्तीला कोणी नसला तर ते कोणाला तरी पकडून आणीत असत. पंक्तीस २।४ मंडळी असल्याशिवाय त्यांना अन्न गोड लागत नसे. श्रीमंत-गरीब हा भेदभाव त्यांच्या ठिकाणीं नसे. रविवारीं, आणि सुटीच्या व सणाच्या दिवशीं त्यांच्याकडे स्नेही मंडळींचा एक मोठा आखाडाच जमत असे, आणि सर्वांनींच आनंदानें सहभोजन करणें, सोंगट्या, पत्ते, बुद्धिबळ व गंजिफा खेळणें आणि गप्पा मारणें असा त्यांचा कार्यक्रम असे. पाहुण्यांस तर नेहमीं मुक्तद्वार असे. म्हणून त्यांच्या घराला थट्टेनें 'धर्मादाय हिंदु हॉटेल' असें म्हणत असत. लोणावळयास जेव्हां त्यांनीं बंगला बांधला आणि उन्हाळयांत ते जेव्हां तेथें राहण्यास जात, तेव्हां पाहुण्यांचा ओघ तिकडेच वळे आणि त्यांच्या बंगल्याला 'धर्मादाय हिंदु हॉटेलची लोणावळी शाखा' असें नामाभिधान


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें,

लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी

**छबिलदास रोड, दादर, मुंबई २८ (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमची कोठेंही शाखा नाहीं ***

मिळत असे. लोणावळा स्टेशनवर येणाऱ्या गाड्यांच्या वेळीं काकासाहेब किंवा त्यांचे धाकटे बंधु स्टेशनवर जात असत आणि प्लॅटफॉर्मवर बसून पाहुण्याची वाट पहात असत आणि कोणी स्नेही दिसल्यास त्यास आपल्या घरीं नेत असत. या निमित्तानें त्यांचे हातून बरेंच अन्नदान झालें. या गृहस्थाश्रमांत त्यांनीं चारी धामांच्या यात्रा कुटुंबांतील मंडळीसह केल्या. १९०६ सालीं ते विलायतेस जाऊन आले. याप्रमाणें संसारांतील मुख्य इतिकर्तव्यें पार पाडून नंतर उतारवयांत ते परमार्थाकडे वळले. येथें त्यांचा दुसरा म्हणजे गृहस्थाश्रम संपला आणि शिरडीस जाऊन त्यांनी तिसरा म्हणजे वानप्रस्थ आश्रम सुरू केला.

**उदयाशंकर याज्ञिक :** गृहस्थाश्रमांत काकासाहेबाचें देवदेवतार्चन किंवा सोंवळेओंवळें वगैरे कांहीं विशेष म्हणण्याजोगें असें नव्हतें. परंतु शुचिर्भूतपणें ते नेहमीं ईशचिंतन करीत असत. श्री. उदयाशंकर याज्ञिक या नांवाचे त्यांच्याच नागर जातीचे काकासाहेबाचे स्नेही असत, ते विद्वान असून त्यांनीं काठेवाड संस्थानांत पुष्कळ वर्षे दिवाणगिरी केलेली होती. ते बहुश्रुत व वेदांत व्यासंगी होते. सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनीं चतुर्थाश्रम घेतला होता. त्यांचे दोन फोटो-एक गृहस्थाश्रमांतील व दुसरा चतुर्थाश्रमांतील असे काकासाहेबांनीं आपल्या देवखोलींत लावलेले होते. त्यांच्याप्रमाणें आपणहि चतुर्थाश्रम घ्यावा अशी काकासाहेबांची मनीषा होती. त्याप्रमाणें वय वाढत चाललें तसतसा त्यांनीं आपल्या कामाचा व्याप कमी करण्याचा संकल्प केला. ते प्रथम बांद्रें मुक्कामीं समुद्रकांठीं एका निवांत बंगल्यांत रहात असत. पुढें त्यांनीं गिरगांव बॅक रोडवर एक बंगला बांधून तेथें ते राहण्यास गेले. परंतु मुंबईची बजबजपुरी त्यांना पसंत न पडल्यामुळें ते पुनः बांद्रे येथें राहण्यास गेले. पुढें त्यांना बांद्रेहि न आवडल्यामुळें त्यांनीं व्हिलेपारले येथें एक, स्टेशपासून लांब अशी जागा घेऊन तेथें एक मोठा व लहान बंगला ( स्नेह्यासाठीं ) बांधून ते तेथें राहूं लागले.

**श्रीसाईबाबांचें दर्शन आणि त्यांचा परिचय :** यानंतर काकासाहेबांच्या जीवनांत दुसरें एक नवीन दालन उघडलें. १९०९ सालापर्यंत साईबाबा हें नांव काकासाहेबांना माहीत नव्हतें. त्यांचे दर्शन कसें झालें याची हकीकत श्रीसाईचरित्र अध्याय ५१ येथें आलेली आहे आणि श्रीसाईलीला मासिकाच्या गेल्या अंकांत (वर्ष ३५, अंक ४ था, पान २६) संक्षेपानें दिलेली आहे, ती थोडक्यांत अशी—श्रीनानासाहेब चांदोरकर, काकासाहेबांचे जुने स्नेही, त्यांना लोणावळयास भेटले. नानासाहेबांनीं श्रीसाईबाबांची इत्थंभूत सर्व हकीकत त्यांना सांगितली आणि श्रीसाईबाबांच्या दर्शनाविषयीं त्यांचें मन वळविलें. पुढें कांहीं काळानंतर मुंबई धारासभेच्या निवडणुकीसाठीं मतें मिळविण्यासाठीं काकासाहेब अहमदनगरास त्यांचे स्नेही काकासाहेब मिरीकर यांचे घरीं गेले. त्यांचे

चिरंजीव बाळासाहेब मिरीकर (कोपरगांवचे मामलेदार) हेही तेथें आले. पितापुत्र मिरीकरांनीं श्यामा (माधवराव देशपांडे–बाबांचे निकटवर्ती भक्त) आणि बाबांची छबी (तसबीर) यांच्यासह काकासाहेबांना शिरडीस पाठविण्याचा घाट घातला, आणि त्याप्रमाणें काकासाहेब दुसरे दिवशीं सकाळीं दहा वाजण्याचे आंत शिरडीस पोंचले. त्याचवेळीं श्री. नानासाहेब हेही शिरडीस आले, असा हा योगायोग होता. या दर्शनाविषयीं हेमाडपंत श्रीसाईसच्चरितांत (अध्याय ५१) असें वर्णन करितात कीं—

"पुढें होतां साईचें दर्शन ।
दीक्षितांचें द्रवलें मन ॥
नयन झाले अश्रुपूर्ण ।
स्वानंद–जीवन ओसंडलें ॥ ९० ॥
मीही तुझी पाहूनि वाट ।
पुढें शाम्यास पाठविला थेट ॥
नगरास तुझी घ्यावया भेट ।
वदले मग स्पष्ट साई तया ॥ ९१ ॥
रोमहर्षित दीक्षितशरीर ।
कंठीं दाटला बाष्पपूर ॥
चित्त जाहलें हर्षनिर्भर ।
घर्म सर्वांगीं दरदरला ॥ ९२ ॥
देह सूक्ष्म कंपायमान ।
चित्तवृत्ति स्वानंदनिमग्न ॥
नेत्र पावले अर्धोन्मीलन ।
आनंदघन दाटला ॥ ९३ ॥
आज माझी सफळ दृष्टि ।
म्हणोनि चरणीं घातली मिठी ।
मना धन्यता वाटली मोठी ।
आनंद सृष्टी न समाये ॥ ९४ ॥

—पुढें याचा परिणाम किंवा पर्यवसान काय झालें हेंहि हेमाडपंतांनीं थोडक्यांत सांगितलें आहे कीं—

पुढें वर्षांचीं वर्षें गेलीं ।
साईचरणीं निष्ठा जडली ॥
पूर्ण साईची कृपा संपादिली ।
सेवेसी वाहिली निज काया ॥ ९५ ॥
यथासांग सेवाही चांगली ।
करण्यासाठीं मठीही बांधिली ॥
शिर्डीत बहुसाल वस्तीही केली ।
महती वाढविली साईची ॥ ९६ ॥

हें थोडक्यांत, पण मुद्देसूद व बरोबर असें काकासाहेबांच्या शिरडीजीवनाचें वर्णन आहे असें कोणीहि म्हणेल. या वेळेपर्यंत काकासाहेब, 'हरिभाऊ, 'भाऊसाहेब' या नांवानें प्रसिद्ध होते. पण श्रीसाईबाबांनीं त्यांना 'काका' या नांवानें संबोधिलें. तेव्हांपासून ते 'काका–काकासाहेब' या नांवानें पाचारले जाऊं लागले आणि तेंच त्यांचे नांव प्रसिद्ध झालें.

योग्य सत्पुरुषाची गांठ पडल्यावर, त्यांनीं शिरडीयात्रा आणि श्रीबाबाचें दर्शन याविषयीं सर्व हकीगत आपले स्नेही आण्णासाहेब दाभोळकर आणि श्री हरि नारायण आपटे सुप्रसिद्ध कादंबरीकार पुणें, यांना कळविली. यापैकीं आण्णासाहेब दाभोळकर हे महाराजाचे निस्सीम भक्त बनले वगैरे हकीकत सर्वांना ठाऊक आहे. श्री. हरि नारायण आपटे दोन तीनदां शिरडीस गेले, परंतु त्यांची साईच्या ठिकाणीं श्रद्धा जडली नाहीं. मुंबईचे रा. ब. पाध्ये हेही

काकासाहेबचे स्नेही, त्यांनाहि सर्व हकीगत कळविण्यांत आली तरी ते शिर्डीस गेले नाहींत.

दिवसेंदिवस काकासाहेबांना शिरडी इतकी आवडूं लागली कीं, त्यांचा बहुतेक सर्व वेळ तेथेंच जाऊं लागला. श्रीबाबांच्या प्रत्येक शब्दांत व कृतींत कांहीं तरी उपदेश असे. काकासाहेब त्याचें पूर्ण मनन व आकलन करीत असत आणि त्यांतील मर्म हुडकून काढीत असत. श्रीबाबांच्या गोष्टींचा व उद्गारांचा काकासाहेब संग्रह करीत असत. अशा टिपणांचा संग्रह मोठा होता, पण त्यांच्या निधनानंतर त्याचा शोध केला तरी तो सर्व मिळाला नाहीं. जितका कांहीं मिळाला तो महाराजांचे अनुभव, बोधपद्धति–बोल या सदराखालीं श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध झाला आहे. महाराजांविषयीं इतकें सूक्ष्म निरीक्षण दुसऱ्या कोणीं केलें नसेल! महाराजांचेंहि काकासाहेबांवर उत्कट प्रेम होतें. महाराजांनी त्यांना अनेक कसोट्या लावून निरखून, पारखून नंतर त्यांचेवर प्रेम केलें. या कसोट्यांपैकीं एक कसोटी 'बोकडाची हत्या' नमुन्यासाठीं येथें देत आहे. ती येणेंप्रमाणें— श्री साई–चरित्र अध्याय २३ यांत सांगितलेली।

एकदां एक कौतुक वर्तलें तें असें. कोणी एकानें एक बेवारशी, दुर्बळ आणि आसन्नमरण असा एक बोकड मशिदींत आणून सोडला. त्यावेळीं मालेगांवचे पीरमहमद ऊर्फ बडेबाबा, साईबाबांजवळ बसले होते. या बडेबाबाचें प्रस्थ बाबांजवळ फार असे. तो नेहमीं बाबांच्या उजव्या बाजूस बसे. जेवणाची पानें मांडून सर्व तयारी झाली कीं बाबा त्याला आदरानें हाक मारीत आणि तो वर येऊन बाबांच्या डाव्या हाताच्या पानावर बसे. तो बाहेर जावयास निघाला, कीं बाबा त्याला शंभर पावलें पोंचवावयास जात. दक्षिणेच्या जमलेल्या रकमेंतून बाबा रोज त्याला पन्नास (५०) रुपये देत. अशा या बडेबाबांला बाबांनीं सांगितलें कीं–दे त्या (बोकडा) बळी। निर्दाळी एका प्रहारें;" (ओवी १११), तेंव्हां बडेबाबांनीं उत्तर दिलें कीं कैसा बे काटना इसकूं खाली" (ओं. १२८) तेव्हां बाबांनीं श्यामला सांगितलें कीं, 'तूं तरी सुरी आण। कापूं बोकडातें त्या आतां॥ (ओं. १२९), श्यामानें राधाकृष्णमाईकडून एक सुरा आणला, पण तो कोणत्या कामासाठीं हें जाणून तिनें तो सुरा परत मागून घेतला. नंतर काकासाहेबांची पाळी आली,'

मग काकाचें पहावया मानस।
बाबा तंव आज्ञापिती तयास॥
जा तूं सुरा आण कापावयास॥
निर्मुक्त सायास करी त्या॥ (ओं. १३४)
'काका बावनकशी सुवर्ण।
बाबास जरी ठावे पूर्ण।
तथापि ते ताविल्यावांचून।
निवती न नयन जनांचें (ओं. १३५)

लगेच काका साठेच्या वाड्यांत गेले आणि आज्ञेप्रमाणें शस्त्र आणलें आणि तिळमात्र न कचरतां बोकड मारण्यास सिद्ध झाले.

जन्म निर्मळ ब्राह्मणवंश ।
जन्मादारभ्य व्रत अहिंसा ॥
तयावरी हा प्रसंग ऐसा ।
हात कसा वाहील ॥ १५१ ॥

गुर्वाज्ञापालनीं निधडा ।
केला मनाचा एकदां घडा ॥
परी छाती उडे धडधडा ।
घाम भडभडा सुटला ॥ १५२ ॥

मांसाहारी मुसलमान बडे बाबा यानें शस्त्र चालविण्याचें नाकारलें, तर शुद्ध पवित्र ब्राह्मण काकासाहेब यांनीं सुरा चालविण्याची तयारी केलेली पाहून लोकांना आश्चर्य वाटलें. कासोटा (धोतर) आवळून ते पुढें झाले, तेव्हां त्याच्या हृदयीं कृपा उपजून त्यांचा हात पुढें होईना, सुरा चांचरून मागें जाऊं लागला. तेव्हां बाबा म्हणाले—'हूं मार आतां काय बघसी ?' ही अखेरची आज्ञा ऐकून आवेशानें प्रहार करण्यासाठीं ते अर्ध-वर्तुळ फिरले आणि प्रहार करणार, इतक्यांत बाबा म्हणाले—

'हां हां काका होय परता ।
कायरे तुझी हे निष्ठुरता ॥
ब्राह्मण होऊनी हिंसा करितां ।
विचार चित्ता नाहीं कां ॥ १६८ ॥

ऐसें परिसतां टाकिला सुरा ।
आश्चर्य वाटलें लहान थोरा ॥
जीवदान लादला बकरा ।
गुरुभक्ति शिखरा चढविली ॥ १६९ ॥

मग काका सुरा टाकोन ।
काय वदता द्या अवधान ॥
बाबा आपुलें अमृतवचन ।
धर्मशासन तें आम्हां ॥ १७० ॥

आम्हीं नेणूं दुजा धर्म ।
आम्हां नाहीं लाज शरम ॥
गुरुवचन पालन हेंच वर्म ।
हाचि आगम आम्हां तें ॥ १७१ ॥

शिर्डीस काकासाहेब १९०९ सालीं प्रथम गेले. त्यावेळीं बाबा एका पोत्यावर बसलेले असावयाचे. मशिदींत मातीचे घडे, कोळंबी व टिनचीं टंबरेलें, याशिवाय कांहीं नसे. मशिदींतील मातीची जमीन उखळलेली असावयाची. बाबा स्वतः ती कधीं कधीं शेणानें सारवीत असत. ५०' मोकळें अंगण असे, सभामंडप नव्हता, तो नंतर झाला. धुनीकरितां अंगणांत त्यांनीं खरेदी केलेल्या लांकडाच्या मोळ्याचे ढीग होते.

यावेळीं शिरडींत राधाकृष्णमाई (मूळ नांव सुंदराबाई क्षीरसागर) नांवाची एक विधवा भक्त राहत होती. तिनें बाबांच्या सेवेला सर्वस्वी वाहून घेतलें होतें. काकासाहेबाच्या संमतीनें तिनें चांदीची भांडीं, पालखी आणि इतर सर्व जिन्नस जमवून शिरडीला संस्थानचें स्वरूप आणलें. काकासाहेब शिरडीस रमले पण त्यांना इष्ट असलेला एकान्तवास तेथें त्यांना मिळेना. दिवसेंदिवस लोकांची गर्दी वाढू लागली. तेव्हां आपण येथें एक वाडा बांधावा असें त्यांनीं ठरविलें, आणि श्यामाच्या मार्फत त्यांनीं बाबांची अनुज्ञा मिळविली आणि आपले बंधू भाईजी कांट्राक्टर यांचेकडून प्लान तयार करून वाडा बांधवून घेतला. बाबांच्या गुरुची समाधि म्हणजे साठेवाडा यांचे समोर हा वाडा—प्रशस्त माडी, हॉल आणि खोल्या असा बांधून घेतला.

आतां या वाड्याचें रूपांतर होऊन गेलें आहे. माडीवर बाबांचा फोटो लाविला होता आणि तेथें रोज बाबाची पूजा व आरती होत असे. दिवाणखाना आणि खोल्या राहण्यासाठीं उपयोगांत आणीत असत. फोटोच्या बाजूस काका नेहमीं राहत असत. शिरडीच्या सर्व तरुण लहान लोकांना ते साहाय्य करीत असत आणि त्यामुळें ते तेथें फार प्रिय झाले होते.

वाडा बांधल्यावर पार्ल्याहून काकांची मंडळी — सौ. सरस्वतीबाई उर्फ भावीशाहेब, चिरंजीव रामकृष्ण उर्फ बाबु, आणि मुलगी वत्सला वगैरे तेथें राहण्यास आली. यापैकीं वत्सला शिरडीस वारली. ज्या दिवशीं ती वारली, त्या पहाटे तिला एक स्वप्न पडलें. त्यांत महाराज तिच्याजवळ येऊन तिला म्हणाले—इथें कशाला राहतेस? चल आपण त्या लिंबाखालीं जाऊन राहूं.’ मुलीनें सकाळीं हें स्वप्न सांगितलें. तेव्हां पासून तिची प्रकृति जास्त बिघडली आणि दुपारीं ती निवर्तली. मुलगी फार प्रेमळ हुशार व गोड होती. त्यामुळें तिच्या आईबापांना फार दुःख झालें. त्या दिवशीं दुपारीं श्रीएकनाथमहाराजाचा ‘भावार्थरामायण’ हा पोष्टानें ग्रंथ आला. बाबांनीं त्याला स्पर्श करून काकासाहेबांकडे दिला आणि मुलीच्या निधनाच्या शोक निवारणार्थ किष्किंधाकांडांतील, वालीचा वध झ ल्यानंतर तारा शोक करीत असतां रामानें तिला जो उपदेश केला (अध्याय७, पान १९० निर्णयसागरात) तो वाचून मनन करण्यास सांगितलें. पुढें काकासाहेब नियमानें भावार्थरामायण वाचूं लागले.

काकासाहेबाचा मुलगा बाबू हा लहान होता. तो शिरडीच्या शाळेस जाऊं लागला. कै. बाळासाहेब भाटे यांचा वडील मुलगा दीक्षिताच्या मुलाच्या वयाचा होता तो त्या शाळेंतच होता. दोघां बाबूंची गट्टी जमली. ही दोन्ही मुलें चावडीच्या रात्रीं जरीच्या टोप्या घालून काळी रेघ व मुद्रा लावून महाराजाचे छडीदार होत आणि महाराजाचे दोहे म्हणून ‘आलबेली सरकार’ म्हणून पुकारा करीत. या दोन्ही बाबूंचे शिरडीस प्राथमिक शिक्षण झाल्यावर त्यांना विहलें पार्लें (मुंबई) येथें पाठवून त्यांचें दुय्यम शिक्षण करून घेण्यांत आलें. त्यांची मॅट्रीक्युलेशन परीक्षा पास झाल्यावर त्यांना काशीच्या सेंट्रल हिंदू कॉलेजांत पाठविण्यांत आलें. तेथें बाबु दीक्षित बी. एस. सी. आणि बाबु भाटे बी. ए. झाले. पुढें भाटे यांनीं बॉंबे बँकेंत १०० रु. पगारावर नोकरी धरिली. पण पुढें तो फार दिवस वांचला नाहीं. त्याला दीक्षितांनीं आपल्या घरच्या मंडळीप्रमाणें वागविलें.

**काकासाहेबाचा धंदा**: काकासाहेब महिन्याचे महिने शिरडीस राहूं लागल्यामुळें मुंबईच्या त्यांच्या धंद्यावर वाईट परिणाम होऊन उत्पन्न घटत चाललें. त्यांचे भागीदार धनजी शहा (सर दिनशादावर हायकोर्ट जज्ज यांचे जामात) आणि रा. ब. सुंदरदास नारायणदास या त्यांच्या भागीदारांनीं काकासाहेबाच्या गैरहजिरीबद्दल बाबांजवळ तक्रार केली आणि बाबांनींहि काकासाहेबास मुंबईस जाऊन धंद्याकडे

लक्ष देण्यास सांगितलें. त्याप्रमाणें काका मुंबईस गेले, पण त्यांचें लक्ष्य धंद्याकडे लागेना. तेव्हां त्या दोन्ही भागीदारांनीं आपली भागी काढून घेतली. पुढे त्यांच्या नागर जातीचे, नवीन पास झालेले सॉलिसिटर पुरुषोत्तमराय मार्कंड हे भागीदार त्यांना मिळाले, पण पुढें तेहि फार वेळ टिकले नाहींत. पुढें माणिकलाल ललुभाई मेहता हे काकासाहेबांना मिळाले आणि दीक्षित माणिकलाल आणि कंपनी या नांवानें ऑफिस सुरू केलें. काकासाहेबांच्या गैरहजेरीबद्दल त्यांनीं कधींहि तकरार केली नाहीं. काम न करितां प्राप्तीचा मोठा भाग आपण घ्यावा हें काकासाहेबांना योग्य न वाटून त्यांनीं आपली भागिदारी बंद केली आणि सर्व काम माणेकलालवर सोंपविलें. बाबांची तसबीर असलेली आपली खोली आपल्याकरितां राखून ठेवावी म्हणजे मुंबईस येऊं तेव्हां बसावयास जागा राहील. एवढीच अट त्यांनीं घातली आणि ती मान्य करण्यांत आली. माणेकलाल ५०० रुपये देऊन शिरडी संस्थानचे ते आश्रयदाते बनले. त्यानंतर दीक्षित माणेकलाल आणि कंपनी ही पेढी पुष्कळ दिवस चालू होती, पण काकासाहेबांचा धंद्यांचा संबंध तुटून शिरडी हेंच त्यांचें राहण्याचें मुख्य ठिकाण बनलें.

**शिरडींत काकांचा नित्यक्रम :** सकाळीं लवकर उठून ते काकड—आरतीस जात. तेथून परत आल्यावर स्नान करून वाड्यांतील माडीवरच्या बाबांच्या तसबिरीची पूजा करून नंतर चहा घेऊन द्वारकामाईत जावयाचें व तेथें कांहींवेळ बसून बाबांबरोबर लेंडीस जावयास निघावयाचें. बाबा लेंडीस पोचल्यावर ते परत वाड्यांत येत आणि शिरडीस दर्शनास येणाऱ्या भक्तांची चौकशी आणि सर्व सोय करीत. दुपारच्या नैवेद्यांतील शिऱ्याचा कांहीं भाग बाबा घेत असत हें पाहून काका रोज स्टोव्हर शिरा तयार करीत आणि नैवेद्य म्हणून मशिदींत बाबांकडे नेत असत. बाबांनीं त्यांतील भाग स्वीकारला म्हणजे ते परत वाड्यांत भोजनासाठीं येत असत आरतीच्या वेळीं ते हजर असत. पुढें काकासाहेबांचें भोजनहि महाराजांसमवेत द्वारकामाईत होऊं लागलें. याप्रमाणें मोठ्या आनंदानें काका शिरडीस कालक्रमणा करूं लागले. यापूर्वी त्यांचे धार्मिक ग्रंथ वाचन फारसें झालें नव्हतें. त्यांनीं रामविजय, हरिविजय हीं पुराणें वाचलीं. तेव्हां त्यांना पुराणाची गोडी लागली. कृष्णदयार्णवस्वामींनीं श्रीभागवतांतील दशम स्कंधावर 'हरिवरदा' नांवाचा ओवीबद्ध टीकाग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ बराच मोठा असून त्यांत समग्र कृष्णचरित्र आलें आहे. हा ग्रंथ भक्तिरसप्रधान व फार प्रेमळ आहे. काकांनीं या ग्रंथाचें समग्र परिशीलन शिर्डीस केलें.

काकासाहेबांची प्रथम प्रथम सांपत्तिक स्थिति बरी होती. मुंबई लोणावळें, व्हिलेपारलें व शिरडी येथें त्यांनीं वाडे किंवा घरें बांधलीं. परंतु त्यांचा स्वभाव व उदार व धार्मिक असल्यामुळें आणि परमार्थाकडे विशेष लक्ष लागल्यामुळें त्यांची आर्थिक

स्थिति खालावत गेली आणि त्यांना द्रव्याची टंचाई भासूं लागली. महाराजां-प्रीत्यर्थ आपणास मनाजोगा खर्चकरितां येत नाहीं म्हणून त्यांना खेद वाटे. 'मी करितों' हा अभिमान नाहींसा करण्यासाठींच आपल्यावर असा प्रसंग आला अशी त्यांची समजूत असे. 'यस्यानुग्रहमिच्छामि तस्य वित्तं हराम्यहम्' असें भागवतांत सांगितल्या-प्रमाणें त्यांचेवर अनुग्रह होण्याची वेळ जवळ येत चालली, तेव्हां तेहि ठेविलें. "**अनंतें तैसेंचि रहावें**" या तुकारामाच्या उक्तीप्रमाणें—समाधानानें राहूं लागले.

**काकांचा आजार :** शिरडीस काका-साहेबांना जोरांत ताप भरला आणि त्यामुळें ते बरेच अस्वस्थ झाले. माधव-रावांनीं हें बाबांना कळवितांच, त्यानीं उदी देऊन माधवरावास बरोबर घेऊन व्हिले पारलें येथें घरीं जाण्यास त्यांना सांगितलें. 'तूं पडी घेऊं नकोस. रोज थोडा शिरा खात जा." अशी बाबांनीं आज्ञा केली आणि चार दिवसांनीं दुखणें निघून जाईल असें सांगितलें. तेव्हां ते शिरडीहून निघून व्हिलेपारलें येथें आले. प्रवासाच्या त्रासानें व श्रमानें त्यांची प्रकृति अधिक बिघडली. काकांचे मित्र डॉ. मॉन्टी यांना बोलावून आणून त्यांचे उपचार सुरू झाले. डॉ. मॉन्टी यानी ही नवज्वराची केस आहे असें निदान केलें, आणि पूर्ण विश्रांति घ्यावी (पडून रहावें) आणि कांहीं खाऊं नये असें सांगितलें. काकांनीं ही त्यांची सूचना मानलीनाहीं व ऐकिली नाहीं. तेव्हां डॉ. मॉन्टी यानें आपले उपचार बंद केले, तरी मित्र या नात्यानें त्यांनीं डॉ. लेडी मॉन्टीसह भेटण्यास यावें असें काकांनीं त्यांना सांगितलें, त्याप्रमाणें ते येत असत. पुढें कांहीं दिवस तापाचा भर होता तरी बाबांच्या आज्ञे-प्रमाणें वागून काका पूर्ण बरे झाले. शिर-डीस जाऊन एका फकीराच्या नादीं लागून काका वेडे बनले आहेत आणि त्यांनीं आपला व्यवहार सोडला आहे असा समज जनापवाद काकांच्या मित्र-मंडळींत पसरला होता आणि डॉ. मॉन्टी असे मानणारे एक होते. हा जनापवाद दूर करून काकासाहेबाची योग्यता त्यांच्या मुंबईतील 'स्नेही' मंडळींना पटवून द्यावी असा बाबाचा काकांना मुंबईस पाठविण्याचा हेतु असावा.

काकासाहेब पूर्ण बरे झाल्यावर त्यांच्या शिर्डीतील नित्य कार्यक्रम पुनः सुरळीत सुरूं झाला आणि त्यांचा काल बाबांच्या सान्निध्यांत जाऊं लागला.

साईबाबा हे कधींहि मोठमोठीं प्रवचनें करीत नसत. पण सर्वसाधारण उपदेश गोष्टीच्या रुपानें करीत असत. कोणालाहि गुरुपदेश अगर मंत्रतंत्र उपासना देत नसत. अमुक कर्म करा, किंवा साधन करा असें ते स्पष्ट कधींहि सांगत नसत. 'नीतीनें व सचोटीनें वागा' असा त्यांचा सर्वसाधारण नेहमींचा उपदेश असे. आणि पारमार्थिक उन्नतीला पोषक अशी घटना ते घडवून आणीत. माझ्या द्वारकामाईची पायरी जो एकदां चढला, त्याचा बेडा मी पार करीन असे उद्गार बाबा काढीत असत. काकासाहेब मशिदींत चढले इतकेंच नव्हे तर ते तेथें चिकटून

बसले. तेव्हां त्यांची पारमार्थिक उन्नति साधून देणें बाबांना भाग पडलें.

**वानप्रस्थाश्रम :** आतां काकासाहेब आयुष्यांतील तिसऱ्या आश्रमांत प्रवेश करिते झाले. या आश्रमांत गृहसुतदारा याचा मोह सोडून एकटें किंवा केव्हां केव्हां पत्नीसह वनांत—आश्रमांत राहावें लागतें आणि तेथें विवेकयुक्त पूर्ण **वैराग्य** आणि **नित्यानित्यविवेक** हे गुण संपादावे लागतात. आतां वनें उपवनें येथें जाण्याची सोय नसल्यामुळें गृहसुतदारा यांचेवरील आसक्ति कमी करून काकासाहेब शिरडींत येऊन बाबांच्या सन्निध्यांत राहिले खरे, पण त्यांचा बराच वेळ इतर भक्त मंडळी आणि राधाकृष्णमाई यांचेबरोबर संभाषण करण्यांत जात असे आणि त्यांना जरूर असलेला एकान्तवास मिळत नसे. तेव्हां बाबांनीं त्यांना एक दिवस अशी आज्ञा केली कीं, त्यांनीं आपल्या माडीवर बसून रहावें, इकडे तिकडे कोठें जाऊं नये आणि द्वारकामाईंत माझ्याकडे सुद्धां येऊं नये ! गुरुआज्ञा प्रमाण मानून त्याप्रमाणें त्यांनीं वागण्याचें ठरविलें आणि ते आपल्या वाड्याच्या माडीवर स्थिर झाले. नित्यविधि व स्नान याकरितांच ते खालीं येत असत ते आपलें भोजनहि माडीवरच करीत असत. पण बाबांचें दर्शन घेतल्याशिवाय शिरडींत राहणें त्यांना आवडत नसे. म्हणून शाम्याच्या मार्फत आरतीस हजर राहण्याची आणि चावडीच्या मिरवणुकीमध्यें भाग घेण्याची परवानगी त्यांनीं मिळविली. मशिदींत आरतीची घंटा वाजली. म्हणजे ते द्वारकामाईंत जात आणि आरतीचा व पूजेचा कार्यक्रम आटपून आणि प्रसाद बाळाच्या सहवासांत सेवन करून आपल्या वाड्यांत परत येत असत, गुरुवारीं चावडीच्या मिरवणुकीस ते हजर राहत असत. याप्रमाणें त्यांनीं नऊ महिने काढले. हें जेव्हां मुंबईंत समजलें तेव्हां पारशी व गुजराथी वृत्तपत्रांतून असा बोभाटा झाला कीं, मुंबईचा एक प्रसिद्ध सॉलिसीटर हरि सीताराम दीक्षित बुवा म्हणजे संन्यासी वैरागी झाले आहेत. त्यांच्या पत्नीशीं त्यांचा पत्र व्यवहार होता. त्यामुळें त्यांची खरी स्थिति त्यांना माहीत होती, तरी वर्तमानपत्रांतील बातम्या ऐकून त्यांचें मन थोडेसें अस्वस्थ झालें आणि त्यांची स्थिति पाहण्यासाठीं त्या शिरडीस मुलांसह आल्या, त्यांच्यासाठीं एक खोली वाड्यांत राखून ठेविली होती, पण त्यांना माडीवर जाण्याची परवानगी नव्हती, त्यांनीं कोठें निजावें हा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हां श्यामाच्या मार्फत बाबांना विचारून तो सोडविण्यांत आला. फक्त काकासाहेबांनीं एकटेच माडीवर झोपावें असा बाबांचा हुकूम झाला. तेव्हां सर्व वस्तुस्थिति पाहून बाबांच्या अनुज्ञेनें, त्या मुंबईस परत आल्या. मुलांच्या शिक्षणांत खंड पडूं नये किंवा व्यत्यय येऊं नये म्हणून त्या लवकरच परतल्या. काकांची

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें ‘ लायसॉफ तेल ’ वापरा

कांहीं काळजी करूं नको, मी त्याला न्याहाल करीन असे बाबांनीं त्यांना सांगितलें.

या नऊ महिन्यांत वाड्याच्या माडीवर काकासाहेब एकटेच राहत असल्यामुळें ग्रंथांचें वाचनास आणि मननास त्यांना बराच वेळ मिळाला. भागवत दशमस्कंदावरील कृष्णदयार्णव स्वामीकृत 'हरिवरदा' हा मोठा ग्रंथ लवकर संपला. आतां पुढें दुसरा कोणता ग्रंथ वाचूं असें विचारतां बाबानीं सांगितलें कीं एकनाथाची पोथी वाच. वृंदावनाची पोथी म्हणजे भागवत एकादश स्कंदावरील श्री एकनाथ महाराजांची टीका—एकनाथी भागवत काकासाहेब रोज सकाळीं यांतील एक अध्याय, आणि रात्रीं एकनाथाच्या भावार्थरामायणांतील एक अध्याय असे दोन ग्रंथ वाचीत असत. कोणी श्रोते हजर असल्यास मोठ्यानें वाचीत, नसल्यास आपल्या मनाशींच वाचीत. याशिवाय दासगणूकृत 'भक्तलीलामृत' या पोथींतील साईबाबाचे तीन अध्याय (३१,३२,३३) हेहि नियमानें वाचीत. त्यांचें वाचन म्हणजे नुसती पोपटपंची नसे. वाचन व नंतर मनन हीं दोन्हीं चालत. पोथींतील मार्मिक स्थळें हुडकून काढून त्यांतील मर्में जाणून तीं आपल्या आचरणांत आणीत.

याप्रमाणें नऊ महिने गेल्यावर एक दिवस बाबांनीं त्यांच्या व्रताची समाप्ति केली. बाबांनीं त्यांना बोलावून आपल्या बरोबर भिक्षेच्या वेळीं घेतलें. नंतर लेंडीवर नेलें, आरतीपूर्वी पुनः द्वारकामाईंत बोलावून घेतले आणि आतां माडीवर एकटा बसूं नकोस असें सांगितलें. त्या दिवशीं दुपारच्या पंक्तीला दोन मंडळी जास्ती घेतली व त्यांच्या व्रताचें उद्यापन केलें. त्यानंतर काकाचा शिर्डींतील नित्यक्रम पूर्वीप्रमाणें सुरूं झाला.

**संन्यास :** (कफनी परिधान) याप्रमाणें काकासाहेब कसोटीला उतरल्यावर, अंगीं वैराग्य बाणल्याची खूण म्हणून बाबांनीं त्यांना कफनी परिधान करविली. ती मिळाल्यापासून ते ती घातल्याशिवाय वाड्याबाहेर पडत नसत. मुंबईस गेल्यावर स्नानानंतर ती घालीत व पूजा आटपल्यावर काढून ठेवीत. त्यांनीं कफनीचें प्रदर्शन कधींच केलें नाहीं. शिरडीस येतेवेळीं शिवेवर टांगा थांबवून, कोट काढून कफनी घालून गावांत प्रवेश करीत. एक कफनी वापरून जीर्ण झाल्यावर बाबांनीं त्यांना दुसरी दिली कफनी धारण करणें म्हणजे तिचें पावित्र्य सांभाळण्याची जबाबदारी आपली आहे अशी त्यांची भावना होती व या बाबीला ते फार जपत. बाबा अंतर्ज्ञानी आहेत व ते आपल्या मनांतील बरेवाईट सर्व विचार जाणतात हें अनुभवानें समजून, भलतेच अमंगळ विचार ते आपल्या मनांत कधीं येऊं देत नसत. एखादे वेळेस आल्यास ते बाबांची क्षमा मागत, बाबा अत्यंत दयाळु व क्षमाशील आहेत हें ते जाणत होते.

**भगवद्भावो सर्वभूतीं :** भागवत व रामायण या ग्रंथांचीं पारायणें केल्यामुळें आणि वानप्रस्थ—आश्रमांतील साधन केल्यामुळें तें भूतमात्रांत ईश्वर पाहूं

लागले. याची थोडी उदाहरणें देत आहे. (१) व्हिलें पारलें येथील घरामध्यें ४।५ मंडळी चहापान करीत असतां एकदां एक मोठा विंचु टेबलाखालीं आला. मंडळी त्याला मारणार होती, पण काकासाहेबांनीं त्यांना तसें करूं न देतां, हळुच त्या विंचवाला पकडून त्याला लांब फेंकून देऊन जीवदान दिलें. (२) ढेंकणाबद्दलहि त्यांना सहानुभूति असे. कीटींग्स पॉवडर घालून किंवा अन्य रीतीनें ढेंकणाला मारणें त्यांना आवडत नसे. ते म्हणत असत कीं, ढेंकूण हे माणसाच्या रक्तावर जगतात हें खरें, पण किती थोडें रक्त त्यांना पुरतें आणि किती खुबीनें तें काढून घेतात. आणि ईश्वरहि या छोट्या प्राण्यामध्यें आहेच. तेव्हां त्यांची हत्या कां करा ! हें तत्त्वज्ञान पुष्कळांना चमत्कारिक वाटेल यांत शंका नाहीं. (३) २५।३० कुत्र्या-मांजरांना ते रोज अन्न घालून पोसीत असत. त्यामुळें कुत्र्या-मांजरांनीं त्यांचे घराजवळ वसाहतच केली होती.

**काकासाहेबांचें भजन :** त्यांना भजनाची फार आवड असे. पण त्यांचा आवाज चांगला नव्हता आणि भजनाची हातोटीहि नव्हती. पार्ल्यास त्यांचे बंगल्यावर कै. रघुनाथराव तेंडुलकर सकुटुंब येऊन भजन करीत किंवा नारायणस्वामी (नानासाहेब ठोसर) हेहि नेहमीं येऊन


## लहान मुलाच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

: स्टॉकिस्ट :

**कांच —लाल वाडीलाल कं.,**
दवाबझार, मुंबई २

## अर्नाळकर ब्रदर्स

### चष्म्यांचे व्यापारी

आमच्या येथें **डोळ्यांची मोफत तपासणी** करून शास्त्रोक्त चष्मे **वेळेवर** तयार करून देण्यांत येतील. सर्व प्रकारच्या फ्रेम्स् व कांचा मिळतील. एकदां आमच्या दुकानीं आल्यानंतर तुम्हीं आमचे कायमचे ग्राहक बनाल.

: मालक :

**बाबूराव अर्नाळकर**
२५५ गिरगांव रोड,
सरकारी तबेल्यासमोर, **मुंबई ४**

**वि. सू:**—श्रीसाईभक्तांसाठीं खास सवलतीचे दर

भजन करीत. त्यांचा आवाज गोड व भजन प्रेमळ असे. तेव्हां तें ऐकतांना काकांच्या डोळ्यांतून अश्रु येत असत. ते मनांतल्या मनांत शिर्डीस किंवा पार्ले येथें भजन ( पंचपदी ) करीत असत.

**काकांची कविता :** काकांना कविता करण्याचा नाद नव्हता. पण त्यांनीं एकदा रचिलेलें सुंदर पद व अभंग श्री. बाळासाहेब देवांना दाखविला. तेव्हां आपण कविता करून देत जा. ती प्रसिद्ध केली जाईल असें सांगतां ते म्हणाले—कविता करण्याची आपली योग्यता नाहीं, प्रेमळ कविता संतांनींच करावी. आजपर्यंत मोठमोठ्या संतांनीं कवितां केल्या आहेत त्या थोड्या आहेत काय? त्या प्रेमळ कविता गायचे सोडून आपल्या नीरस कवितेची त्यांत कां घाला! कवित्व केल्यानें आपला अभिमान वाढतो आणि अभिमान तर परमार्थाला मारक आहे. तेव्हां ही नसती पंचाईत कशाला? संतांच्या काव्यांनीं परमेश्वराला आळवलें तर तो वश होणार नाहीं काय? सारांश कविताविषयीं म्हणा किंवा लेखाविषयीं म्हणा त्यांना स्वतःची प्रसिद्धी नको होती. आपले अनुभव प्रसिद्धी करणें म्हणजे तो एक प्रकारचा अभिमान अंगीं घेणें अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती आणि त्यामुळें त्यांचे बरेचसे अनुभव प्रसिद्ध झाले नाहींत.

**बाबांची महासमाधि :** इ. स. १९१८ सालीं ज्या दिवशीं ( विजया दशमी ) बाबांनीं महासमाधि घेतली त्यावेळीं दुपारीं काकासाहेब द्वारकामाईंत होते. त्यावेळीं बाबांनीं त्यांना, बापुसाहेब बुटी आणि इतर भक्त यांना वाड्यांत जेवण्यासाठीं पाठवून दिले आणि इकडे आपण शांतपणें स्वस्थपणें आणि कोणतीहि गडबड न होतां समाधि घेतली हें सर्वांना माहीत आहे. त्यानंतर दोन मोठे प्रश्न उपस्थित झाले. (१) बाबांचा पार्थिव देह कुठें ठेवायाचा आणि आणि (२) राधाकृष्णमाई आणि काकासाहेब यांनीं जमविलेली, भांडीकुंडी, सामान पालखी, जडजवाहीर वगैरे संस्थानच्या इष्टेटीची विल्हेवाट कशी करावयाची, हे दोन्ही प्रश्न काकासाहेबांनीं इतर भक्तांच्या साहाय्यानें व सम्मतीनें उत्तम रीतीनें सोडविले. बाबांच्या इच्छेप्रमाणें आणि बहुतेक भक्तांच्या मनाप्रमाणें बाबांचा देह बुटी वाड्यांतच ठेवून त्यावर समाधि बांधण्यांत आली आणि आतां तो वाडा किंवा समाधिमंदिर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. बहुतेक भक्तांच्या इच्छेप्रमाणें काकासाहेबानीं शिरडीसंस्थानची रचना व घटना तयार करून ती अहमदनगर डिस्ट्रीक्ट कोर्टांतून मंजूर करूनहि आणली. त्याप्रमाणें पांच ट्रस्टी (विश्वस्त) आणि पंधरा मेंबरांची कमिटी यांचेमार्फत संस्थानची व्यवस्था व्हावयाची असें ठरले होते. आतां त्याप्रमाणें पांच ट्रस्टी आणि पंधरा मेंबर्स असून त्यांच्या निवडणुकीच्या नियमांत बराच फेरफार झाला आहे. काकासाहेबानीं आपल्या हयातींत कमिटीचें मेंबर या नात्यानें चिटणीसाचें काम बरींच वर्षें उत्तम रीतीनें केलें आहे.

**काकांचा अंतःकाल :** बाबा एकदां शिरडींत काकांच्या समाधानार्थ असें म्हणाले होते कीं, आपण त्याला विमानांतून नेऊं (म्हणजे त्याला उत्तम गति मिळेल), तो प्रसंग १९२६ सालीं आला. ता. ५ माहे जुलई—एकादशीच्या शुभ मंगल दिवशीं, काकासाहेब हे अण्णासाहेब दाभोळकर व काकासाहेब तेंडुलकर विलेपारलेहून मुंबईस जाण्यास निघाले. त्यांचा पुत्र, डॉ. गोपाळराव देशमुख यांच्या हॉस्पिटलांत आजारी होता आणि त्याचें अपेंडिसायटिस आपरेशन व्हावयाचें होतें. त्यांना गाडींत चांगली जागा मिळून बाबांच्या गोष्टी सांगत आणि बाबांचें स्मरण करीत ही मंडळी निघाली. सांताक्रुझचें स्टेशन जवळ येते न येते तोंच काकांना भोंवळ आली आणि त्यांचा शरीराचा तोल जाऊन त्यांना झोंप येत आहे असें आण्णासाहेबांना वाटलें. त्यांनीं लगेच उपरण्याची गुंडाळी करून त्यांचे मानेखालीं दिली आणि ते पाणी आणण्यास गेले. गाडी जोरानें सुरू झाली. ती परेल स्टेशनवर थांबविण्यांत आली. त्यांचा देह खालीं उतरून घेण्यांत आणि डॉक्टराकडून तपासून घेण्यांत आला. तेव्हां प्राणोत्क्रमण झालेलें आहे असें डॉक्टरानें सांगितलें. नंतर त्यांचा देह विल्हे पारल्यास आणण्यांत आला आणि दुसरे दिवशीं सर्व उत्तरक्रिया करून घेण्यांत आली.

याप्रमाणें काकांचें देहावसान एखाद्या योग्याप्रमाणें, यत्किंचित दुःख व त्रास न होता सुखानें झालें आणि बाबांची उक्ति खरी टरली !

**श्रीसाईनाथाय नमः।**

---


MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 — *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ (मालक : एस्. व्ही. प्रधान

# जाउं जाउं या जवें शीरडी

( चाल : सांइ पायिं दे मजसि आसरा. राग : ललत. ताल : त्रिताल)

जाउं जाउं या, जवें शीरडी ।
प्राप्त होय नच अशि पुन्हां घडी ॥ ध्रु० ॥
माइ द्वारका समाधि मंदिर ।
पाहुनि सांइ मूर्ति मनोहर ।
निंबवृक्षतळिं स्नान गुरूंचें ।
वंदुनि जाइ वांच्छित ते तडी ॥ १ ॥

सज्जनगडिं श्रीरामदासविभू ।
माणिक नगरीं माणिकश्रीप्रभू ।
नृसिंहस्वामी सांइनाथगुरु ।
ब्रह्मवैभवा ज्ञानें उघडी ॥ २ ॥

नामप्रसादें तरूनि गेले ।
भक्त सुशिक्षित; रंक वा भले ।
हिंदु पारशी यवनी जहुदी ।
ओढुनि नेई सांइ, गारुडी ॥ ३ ॥

पाहुनि शिरडीचें हें वैभव ।
मनांत उसळे शुद्ध प्रेमरव ।
आनंदाश्रू भक्ति विधानव ।
तुझ्या आशिची लाभूं दे शिडी ॥ ४ ॥

पूजन करुनी अभिषेकानें ।
आरति म्हणूनी शांत ...
नाम घेउनी कीर्तन श्रवणें ।
धन्य होउं या होउ तातडी ॥ ५ ॥

निष्ठा सबुरी सांइ शिकविती ।
देति शिष्य त्या कृतार्थ करिती ।
जानकि सुत या श्रीपादाची ।
भाषा सुखवो सांइ वाकुडी ॥ ६ ॥

—बाबांच्या बाळाचें बाळ

# योगिराज श्री बंसुरिया बाबा

अनुवादक : **भवानीशंकर नीळकंठ वागळे**

'कुणाकुणाला साधना न करितांच ईश्वर लाभ होतो. त्यांना नित्यसिद्ध म्हणतात. ज्यांना जपतपादि साधना करून ईश्वर लाभ झाला आहे त्यांना म्हणतात साधन सिद्ध. शिवाय, कुणी कुणी कृपासिद्ध असतात. एखादी हजार वर्षांची अंधारी खोली दिवा आंत नेतांच एका क्षणांत प्रकाशित होऊन जावी तसा ह्या कृपासिद्धांचा प्रकार !'

**——श्री रामकृष्ण परमहंस**

श्रेष्ठ अशा सिद्धांपैकीं प्रेमावतार श्री बंसुरिया बाबा हे एक होते. त्यांचा जन्म शंभर वर्षांमागें झाला व त्यांनीं २१ ऑगस्ट १९५१ रोजीं आपली दीर्घ जीवनलीला संपविली. बाबाजींचा जन्म दरभंगा जिल्ह्यांतील नरौच गांवांत एका नैष्ठिक ब्राह्मणाच्या कुळांत झाला होता. त्यांच्या वडिलांचें नांव गोपाळ झा व मातेचें नांव मधुराणी देवी असें होतें. बाबाजींचें पूर्वाश्रमीचें नांव नृसिंह असें होतें. बाबाजी आपल्या आईवडिलांचे कनिष्ठ पुत्र होते.

जगदंबामाता संतांद्वारें अगम्य लीला करीत असते आणि त्यावेळीं संत व अनंत एक होतात. मिथिला नगरीमध्यें सारेच मासे खातात. मधुराणी देवी पण मासे खात होती परंतु बाबाजी मातेच्या पोटांत असतांना जेव्हां ती मासे खात होती तेव्हां तिला नेहमीं उलट्या होत असत. परिणामीं बाबाजींच्या मातेनें मासे खाणं बंद करून टाकलं आणि तिच्या उलट्या बंद झाल्या. कदाचित् मातेच्या उदरांत असलेल्या पुण्यपुरुषाला हिंसा न्य नसावी. बाबाजी त्यांच्या बालपणीं सर्वांचे आवडते होते. त्यांना खाण्याकरितां दिलेले पदार्थ ते आपल्या सवंगड्यांना वाटून टाकीत होते. घरामध्यें भगवती-मातेची पूजा—अर्चा चाललेली पाहून बाबाजींना आनंद होत असे व तेही जगदंबेची प्रेमपूर्वक पूजा करून ध्यान-मग्न होत असत. युवावस्थेमध्येंच अधिकारी पुरुषाकडून दीक्षा घेऊन, नाना साधनाद्वारें बाबाजींनीं सिद्धी प्राप्त करून घेतल्या. त्यांनीं आपल्या सिद्धीचा उपयोग विधायक कार्यांसाठींच केला. जे चमत्कार करतात ते संत नव्हेत असें कांहीं विद्वान म्हणतात. पण संत आपणाहून कधीच चमत्कार करीत नाहींत.

भक्ताचें ब्रीद राखणें हे देवाचें कार्य असल्यामुळें देवच वेळप्रसंगीं भक्ताकरवीं चमत्कार करवितो. आद्य शंकराचार्यापासून श्रीसाईबाबांपर्यंत जेजे कोणी संत होऊन गेले त्यांच्या हातून झालेले चमत्कार जे आज त्यांच्या चरित्रामधून प्रसिद्ध झालेले आहेत. ते भगवंतानेंच आपल्या प्रिय भक्तांचें ब्रीद राखण्यासाठींच केलेलें आहेत. चमत्कार म्हणजे कपोलकल्पित कथा आहेत, असें जें कोणी विद्वान पुरुष म्हणतात तें सत्य नव्हे. सर्वशक्तिमान अनंताशीं एकरूप झालेलें संतच चमत्कार करूं शकतात हेंच खरें सत्य. आणि या सत्याचा स्वभाव घेतलेली हजारों माणसें या भारतांत आहेत व अशा सत्य घटनांचा उल्लेख शेंकडों वर्षांच्या इतिहासांत साक्षी पुराव्यानिशीं सांपडतो. असो.

बाबाजींना ज्या ज्या वस्तूंची इच्छा होई ती ती वस्तु त्यांच्यापुढें चटकन येई. आणि ज्या वस्तूंची त्यांना जरूरी लागत नसे त्या एका क्षणांत समोरून अदृश्य होत. बाबाजी पूजेला बसलेले असतांना जगदंबेची मूर्ति त्यांना सोनें, चांदी, व दगड वगैरे मधून जशी हवी असेल तशीच येऊन पुढें उभी राहत असे व पूजा होता क्षणींच ती मूर्ति अदृश्य होत असे. बाबाजी आरति झाल्यानंतर तेथें उपस्थित असलेल्या मुलांना प्रसाद वाटीत असत आणि आश्चर्य हें कीं, प्रत्येक मुलाला त्याच्या इच्छेप्रमाणें निरानिराळा प्रसाद ते वाटू शकत असत.

बाबाजींना वाक्‌सिद्धी पण प्राप्त झाली होती. खऱ्या भावनेनें जे कोणी बाबाजींचें दर्शन घेत असत त्यांची कामना तत्काळ पूर्ण होई. हजारों मुलें बाबाजींच्या आशीर्वादानें परिक्षा पास होत असत व कित्येक माणसें त्यांच्या कृपाप्रसादानें मामुली पदावरून उच्च पदावर आरूढ झालीं व अजूनही त्यापैकीं कांहीं उच्च पदावर सरकारी अधिकारी आहेत. बाबाजींनीं ज्यांच्या शिरावर हात ठेवला ती माणसें ईश्वर भजनाला लागली. बाबाजी त्यांच्या कृतीनें सिद्ध पुरुष होते, हें जाणणारी अनेक माणसें मिथिला नगरींत अजूनही आहेत.

बाबाजींचे भक्त आजही अमेरिकेंत व इंग्लंडमध्यें आहेत. ते गरीब श्रीमंत व भिन्न भिन्न ज्ञातीमध्यें भेदभाव मानीत नव्हते. सारीं जगदंबेचीं बालकें आहेत ही त्यांची भावना होती व त्या भावनेनुसार ते सर्वांवर समदृष्टी ठेवून वागत होते.

भक्तांच्या इच्छेला मान देऊन बाबाजींनीं जन्मभूमि नरौंच येथें जाऊन महासमाधि घेतली. महासमाधीच्या तिसऱ्या दिवशीं सरकारी आदेशाप्रमाणें नरौंच गांवाचें नांव ' नरौंच धाम ' असें ठेवण्यांत आलें. आणि त्या गांवाला आदर्श गांव बनविण्यासाठीं भारत सरकारनें पांच लाख रुपये खर्च केले. आज पूज्य बाबाजींचें दर्शन घेण्यासाठीं असंख्य भक्तजन नरौंच धामला सतत जात असतात व सद्भावनेनें बाबाजींच्या समाधीवर पुष्पांजलि वाहतात.

आईबापांसमोरील एक नेहमींचा प्रश्न

# मुलें अशीं कां वागतात?

'आमच्या वेळीं नव्हतं बाई असलं कांहीं! ही अलीकडची नाना तऱ्हेची औषधं नि फिवषधंहि नव्हती आणि खाण्यापिण्याचें हें सतराशेंसाठ प्रकारहि नव्हते. साधी भात—भाकरी पोरं खात नि तरीहि कशीं गुटगुटीत असत! पण आजच्या पोरांचं एकेक बघावं तें नवलच! कांऽहीं करा, यांना बाळसं येत नाहीं नि किरकिर सुटत नाहीं. काय करावं हेंच समजेनासं होत एकेका वेळीं!'

मुलांच्या आक्रस्ताळीपणानें वैतागलेल्या आयांच्या नि आजीबाईंच्या तोंडून निघणारे असे उद्गार आजकाल घरोघरीं ऐकूं येतील.

हा बाबू बघा! याची आई सुशिक्षित आहे. मुलाला रोज किती कॅलरीज् आणि किती जीवनसत्त्वें मिळालीं पाहिजेत याचा तिनें कसून अभ्यास केला आहे. चवदार पदार्थ करून ती बाबूसमोर ठेवते. पण तरीहि प्रत्येक घांस त्याला भरवतांना तो किती खळखळ करतो! इतका कां याला खाण्यापिण्याचा कंटाळा?

हा सुहास! याला चांगल्या संवयी लागाव्यात म्हणून आईबाप जिवाचा किती आटापिटा करतात. वडील माणसांना मान द्यावा, कुणी विचारलें तर आपलें सबंध नांव नीट सांगावें, आघाशीपणा करूं नये, हें सारें सारें त्याला शिकवलेलें आहे. पण कोणी परकें माणूस घरीं यायची खोटी, कीं अंगांत वारें आल्यासारखें करतो हा! एरवीं दिवसभर भडाभडा बडबडेल; पण कुणी पाव्हण्यानें नांव विचारलें, कीं याच्या तोंडाला जशी खिळीच बसते!

ही निमा! तिच्या प्रकृतीची कोण काळजी घेतात तिचे आईवडील! इतर मुलांच्या संसर्गानें तिला आजार येऊं नये म्हणून हीं दोघें किती जपतात! तिला मुलांत फारसें मिसळूं देत नाहींत. तिचे कपडेलत्ते वगैरे अतिशय स्वच्छ ठेवण्याची काळजी घेतात. पण काय आहे कुणास ठाऊक! शेजारपाजारच्या मुलांपेक्षां हिच्या पाठीशीं आजाराचा ससेमिरा आपला सारखा लागलेला!

हा रमेश! राक्षसांच्या नि भुतांच्या गोष्टी ऐकून मुलांच्या कोंवळ्या मनाला दहशत बसते, या कल्पनेनें असल्या गोष्टी त्याला कधीं सांगितल्या जात नाहींत. तरीदेखील रोज रात्रीं तो झोंपेंतून किंचाळत उठतो नि 'मी आईच्या कुशींत झोंपणार' म्हणून रडत राहातो!

## या गौडबंगालाचा अर्थ

या मुलांच्या आयांना या प्रकारांचा अर्थ कांहीं कळतच नाहीं. असें कां

करतात हीं मुलें ? मुलांच्या संगोपनाचें शास्त्र आतां पूर्वीपेक्षां कितीतरी अधिक प्रमाणांत आयांना ठाऊक असतें. मग त्या शास्त्राचे सगळे नियम कांटेकोरपणें पाळले तरीसुद्धां पोरें हीं अशीं कां वागतात ? हें आहे काय गौडबंगाल ?

एकूण एक सगळे नियम अचूक पाळले तरी एक गोष्ट जर नसेल तर ते नियम सगळे पाण्यांत जातात ! मुलाला अन्नपाणी नीट मिळालें, वस्त्र-प्रावरण चांगलें दिलें, आणि घरदार संपन्न लाभले तरीहि ही एक गोष्ट नसेल तर त्याची वाढ व्यवस्थित होणार नाहीं आणि त्याचे व्यक्तित्व चांगलें घडणार नाहीं.

ही एक गोष्ट म्हणजे आईबापांचें प्रेम.

शांति–समाधानाचें वातावरण, आई-बापांचें परस्पर–प्रेम, आणि बालसंगो-पनाविषयीं एकांतिक 'फॅडांचा' अभाव, हीं ज्या घरांत असतात त्या घरांत मुलें सुखानें चांगलीं वाढतात. उलटपक्षीं घरांत सदैव चिंतेचें वातावरण, आई-बापांची आपसांत नेहमीं धुसफूस आणि मुलांच्या संगोपनाबद्दलचे आईबापांचे कोणतेतरी एकांतिक आग्रह, या गोष्टी असतात तेथें मुलें किरकिरीं, हट्टी आणि असमाधानी अशीं बनण्याचा संभव अधिक.

मुलांबद्दल अनेक आईबापांच्या नेहमीं अपेक्षा काय असतात ? आई जें आणि जेवढें भरवील तें आणि तेवढें मुलानें सदैव संतोषानें खावें, लहान वयांतच मलमूत्रविसर्जनाच्या नियमितपणाची सवय त्याला लागावी, आई घालील तसले आणि तेव्हां त्यानें आनंदानें कपडे अंगांत घालून घ्यावे, आईबापांना सोयि-स्कर असतील अशा त्याच्या झोपेच्या वेळा असाव्यात आणि आईबापांचें त्यानें सदा सर्वकाळ निमूटपणानें ऐकावें, ही आईबापांची आस असते. पण मानव-जातीच्या सुदैवानें असें 'आदर्श' मूल क्वचितच आढळतें.

## व्यक्तिविकासाचें खरें लक्षण

'मुलं आमचं ऐकत नाहींत' ही आईबापांची एक नेहमींची तक्रार असते. मुलांना चांगली शिस्त लागायला हवी हें तर खरंच. पण 'चांगली शिस्त' या शब्दांचा आईबापांनीं ठरवलेला अर्थ मात्र पुष्कळदां साफ चुकीचा असतो. आपल्याला कधीं कसलाच उपसर्ग पोंचणार नाहीं, कसलाहि उपद्रव होणार नाहीं, अशा रीतीनें आपल्या सोयीगैर-सोयीला अनुसरून मुलांनीं सदैव आपण सांगूं तसें वागावें, ही आईबावांची इच्छा असते. ही शिस्त नव्हे, हा आईबापांचा स्वार्थ आहे.

माणसाच्या वाढीचें खरें द्योतक कोणतें ? आपल्या इच्छाशक्तीच्या प्रभा-वानें परिस्थितीवर मात करण्याची धड-पड हे व्यक्तीविकासाचें पहिलें लक्षण आहे. पण आपण मुलांच्या बाबतींत काय करतों ? त्यांच्या व्यक्तित्वविकासाला प्रारंभीच पायबंद बसेल अशी कसोशी करतों ! आपली स्वतःची इच्छा आई-बापांच्या इच्छेला विरोधी अशा रितीनें प्रभावी करण्याची मुलाची खटपट हें त्याची वाढ होऊं लागल्याचें चिन्ह आहे. हां, मुलांच्या इच्छांना किती मर्यादेपर्यंत वाव द्यायचा याचा कांहीं हिशेब असला पाहिजे हें खरें आहे. पण मुलांतच

त्यांच्या सर्व स्वतंत्र इच्छा आणि आपल्या सोयींना प्रतिकूल अशीं सर्व बंडें कठोरपणें निपटून काढणें म्हणजे कांहीं मुलांना शिस्त लावणें नव्हे.

## एका बापाची कहाणी

आपलीं मुलें पुढें कशीं व्हावींत असें आपल्याला वाटतें ? प्रतिकूल परिस्थितीपुढें दीनवाणेपणानें दबून न जातां तिच्याशीं पौरुषानें दोन हात करणारीं तीं कणखर माणसें बनावीं अशी आपली इच्छा असते कीं नाहीं ? पण प्रत्यक्षांत मात्र ही इच्छा नसल्यासारखीं आपण आईबापें वागतों ! 'बस' म्हटलें कीं बसेल आणि 'ऊठ' म्हटलें कीं उठेल इतकी आपल्या मुलांची आज्ञाधारक वृत्ति असावी अशी आपल्याला वेडी हांव असते. 'मुलांना वळण लावण्यांतला पहिला धडा म्हणजे त्यांची स्वतःची अशी स्वतंत्र इच्छाशक्ति पुरीपुरी चिरडून टाकून त्यांना आज्ञाधारक बनविणें हा आहे.' असे उद्गार एका बापानें प्रस्तुत लेखकापाशीं काढले होते ! या बापाचा एक मुलगा वाह्यात् निघालेला आहे नि दुसरा पुरा बावळट बनला आहे ! या दोन्ही मुलांवर तो बाप सारखीच टीका करीत असतो आणि 'अलीकडचीं मुलं एक तर दुष्ट तरी असतात अथवा मूर्ख तरी असतात' असें तळमळीनें म्हणत असतो.

पण या दोन्ही मुलांचें व्यक्तित्व या बापानें आपल्या हातानेंच घडविलेलें नाहीं काय ? आपल्या तत्त्वज्ञानाप्रमाणें दोघांचीहि स्वतंत्र इच्छाशक्ति मारून टाकण्याचा त्यानें जरबेचा प्रयत्न केला. एका मुलानें या जुलमाविरुद्ध बंड उभारलें. बापाकडून तिन्हीत्रिकाळ मार खाल्ला, उपाशीं राहाण्याची शिक्षा भोगली, मर्मभेदक बोलणीं ऐकलीं आणि लहानपणापासून बापाविरुद्ध तो जळत राहिला. जमेल तेथें बापाच्या मनाविरुद्ध वर्तन करून आपली इच्छा गाजविण्याची त्यानें पराकाष्ठा केली. बापाशीं असें उभें वैर ठेवण्याची पाळी आल्यामुळें बापाला जें चांगलें वाटतें त्याच्या नेमकें उलटच तो करीत गेला आणि वाह्यात् बनला.

दुसऱ्या मुलानें आपली इच्छाशक्ति गुंडाळून ठेवली आणि बापाचा शब्द दरक्षणीं प्रमाण मानला. बापाला हें प्रारंभीं बरें वाटलें. पण बापाच्या या कृत्यानें या मुलाला आपली अशी इच्छा उरलीच नाहीं. तो पुरता होयबा बनला. पूर्वी तो बापाचा शब्द मानी. आतां तो बायकोचा शब्द झेलतो. कोणाच्या मताविरुद्ध आपलें मत व्यक्त करण्याचें धैर्यच त्याच्यांत उरलेलें नाहीं.

या दोन मुलांबाबत बापाला जें अपयश आलें आहे त्याचा खरा कर्ताकरविता कोण ? खरा दोष कुणाचा ? मुलांचा कीं बापाचा ? तुम्हींच विचार करून या प्रश्नाचा निर्णय करा.

## प्रेमाच्या अभावीं फाजील लाड

मुलांबद्दल खरें प्रेम नसलें म्हणजे पुष्कळ आईबाप त्यांचें फाजील लाड करतात किंवा त्यांना फाजील शिस्त लावूं पाहातात ! हें म्हणणें विचित्र वाटेल, पण तें वस्तुस्थितीला धरून आहे. अनेक बाया आपल्या मुलांना वाटेल तेव्हां नि वाटेल तें गोडगोड खायला

देतात कां? तसें खायला दिलें नाहीं तर मुलें रडून कटकट करतील ती नको म्हणून! मुलांची ती कर्कश कट-कट नको म्हणूनच पुष्कळदां आईबाप मुलें म्हणतील तसें करतात; मुलांबद्दल प्रेम वाटतें म्हणून नव्हे! मुलांनाहि हें कळून चुकलें कीं तीं आपल्या आई-बापांना गुलामांसारखीं राबवतात!

उलट कांहीं आईबाप मुलांना नेहमीं धारेवर धरतात. तीं अभ्यास करीत असलीं कीं हीं वडील माणसें जवळ उभी राहून मुलें नीट बरोबर वाचीत आहेत कीं नाहींत, बिनचूक लिहीत आहेत कीं नाहींत, याच्याकडे बारीक नजर ठेवतात. जवळ हा मूर्तिमंत धाक उभा असल्यामुळें भ्यालेली मुलें हमखास चुका करतात आणि रोज बोलणीं खातात. अशा धास्तींत अभ्यास करणारीं मुलें कधींहि वरच्या नंबरांना पास होत नाहींत. मग आईबाप विव्हळून म्हणतात, 'काय हीं अलीकडचीं पोरं! इतकं आम्हीं त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देतों तरी त्यांचं वर्गांत कांहीं पुढं पाऊल पडत नाहीं!'

मुलांच्या अभ्यासाबद्दल इतकी रोगट आस्था या आईबापांत कां आढळते? त्यांचें मुलांवर प्रेम असतें म्हणून नव्हे! त्यांची व्यक्तिगत मोठेपणाची हांव इथें असते! 'अमक्यातमक्याचीं मुलं ना! खरीं अभ्यासू! रोज नियमित अभ्यास करून शाळेंत जातात आणि नेहमीं वरचे नंबर पटकावतात,' असें लोकांनीं म्हणावें ही त्यांना आस असते. आपल्या मुलांनीं हा मोठेपणा आपल्याला मिळवून द्यावा ही त्यांची धडपड असते. त्यांचें प्रेम स्वतःच्या लौकिकावर असतें, मुलांवर नव्हे

कितीतरी आईबाप असे उद्गार काढतात,—

'अहो आमचं मुलांवर किती प्रेम आहे! इतर आईबापांसारखीं आम्हीं मुलं मोकळीं वसू सोडलेलीं नाहींत. दिव-साचा प्रत्येक क्षण मुलांच्या अभ्यासाठीं आम्ही खर्च करीत असतों. मुलांचं सगळं यथास्थित व्हावं म्हणून आम्ही आमच्या स्वतःच्या सुखसोईवर पाणी सोडलं आहे. कधीं नाटक नाहीं कीं सिनेमा नाहीं. बालसंगोपनाचं शास्त्र समजावं म्हणून किती पुस्तकं वाचलीं आम्हीं. तीं वाचण्यासाठीं इतर कथा—कादंबऱ्या वाचायलाहि आम्हांला फुरसत मिळत नाहीं. बालसंगोपनाचे नियम आम्ही कटाक्षानं पाळतों. पण सगळं पालथ्या घागरीवर पाणी! आमच्या मुलांना याची काडीमात्र जाणीव नाहीं. आपले आईबाप आपल्यासाठीं किती खस्ता खाताहेत याची कल्पनाहि त्यांच्या मनाला कधीं शिवत नाहीं. खरोखरी आजकालचीं मुलं कशीं अशीं कृतघ्न!'

हे उद्गार करुणाजनक आहेत, पण प्रेमनिदर्शक मात्र नव्हेत. आपण मुलां-करतां मोठा त्याग करीत आहोंत, ही भावना जिथें आहे तिथें प्रेम फार कमी आहे हें नक्की समजावें. आणि मुलें चांगलीं निपजण्याला जर सर्वांत आवश्यक कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे मुलांबद्दल मनापासूनचें प्रेम. बाकीच्या बालसंगोपनादि शास्त्रांनीं सांगितलेल्या साऱ्या गोष्टी अगदीं गौण आहेत.

———

# श्रीरामकृष्णांच्या सहवासांत

अनुवादक—**मंडणमिश्र**

भक्तांशीं बोलत बसलेले असतांना एकदां श्रीरामकृष्ण परमहंस म्हणाले, 'माणसाचा निर्धार ठाम पाहिजे. 'मी मातेचें नामस्मरण केलें आहे. आतां पाप माझ्या वाऱ्याला सुद्धां कसें राहील? मी तिचें बालक आहें. तिच्या सामर्थ्याचा आणि कीर्तीचा वारस आहे' अशी चित्ताची दृढभावना पाहिजे.

'आपल्यांतील तमोगुणाला जर तुम्ही आध्यात्मिक वळण दिलें तर त्याच्या साहाय्यानें तुम्हांला ईश्वर-साक्षात्कार करून घेतां येईल. आपल्या मागण्या ईश्वरावर लादा. ईश्वर कांहीं तुम्हांला परकी नव्हे. तो सर्वस्वी तुमचाच आहे.

"दुसरें असें कीं तमोगुणाचा उपयोग इतरांच्या कल्याणासाठीं करून घेतां येण्यासारखा असतो. वैद्य तीन प्रकारचे असतात—उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ. रोग्याची नाडी पाहून 'अमकें अमकें औषध नेमानें घे' एवढेंच सांगून चालता होणारा वैद्य हा कनिष्ठ होय. रोग्यानें औषध घेतलें कीं नाहीं हें पाहण्याची काळजी तो घेत नाहीं. 'मध्यम' वैद्य रोग्याची परोपरीनें समजूत घालून त्याला औषध घ्यायला लावतो. रोग्याला तो समजुतीच्या स्वरांत सांगतो, "अरे, तूं औषध घेतलें नाहींस तर तुझा आजार जाईल कसा बरें? म्हणून हें औषध घे. मी स्वतः तुझ्यासाठीं हें औषध तयार केलें आहे.' पण परोपरीनें सांगूनहि रोगी हट्टानें औषध घेत नाहीं असें दिसतांच प्रसंगीं त्याच्या छातीवर पाय रोवूनहि जो वैद्य रोग्याला औषध गिळायला लावतो. तो उत्तम वैद्य होय. हा वैद्यांतला तमोगुणाचा आविष्कार. पण त्याच्या तामसीपणानें रोग्याला इजा न होतां त्याचें उलट कल्याण साधतें.

'या वैद्यांप्रमाणेंच धर्मगुरु हे तीन प्रकारचे असतात. कनिष्ठ प्रकारचा गुरु आपल्या शिष्याला फक्त शिकवण देतो, पण शिष्याच्या प्रगतीविषयीं कांहीं चौकशीसुद्धां करीत नाहीं. मध्यम प्रकारचा गुरु शिष्याला मार्ग दाखवितो, त्या मार्गानेंच शिष्याचें कल्याण कसें साधेल हें त्याला परोपरीनें समजावून देतो आणि इतर अनेक प्रकारें त्याच्याबद्दल अगत्य दाखवितो. पण तिसऱ्या प्रकारचा गुरु हा या दोहोंहून निराळा असतो. शिष्य आपली शिकवण आत्मसात करीत नाहीं

असें दिसून येतांच तो प्रसंगीं जबरदस्तीचा उपयोग करूनहि शिष्याला योग्य मार्गानें जायला भाग पाडतो. हा गुरु उत्तम असें मी म्हणतों.'

## मनाच्या सात पातळ्या

मनाच्या विविध अवस्थांचें वर्णन करतांना श्रीरामकृष्ण म्हणाले,

'ब्रह्मज्ञानी माणसाच्या मनाच्या विविध अवस्था वेदांमध्यें वर्णन केलेल्या आहेत. ज्ञानाचा मार्ग अत्यंत अवघड आहे. सांसारिकतेची पुसटशी छटाहि अंतःकरणांत अवशिष्ट असले तर ज्ञान-प्राप्ति अशक्य आहे. कामिनी कांचनाची कणभर आसक्ति शिल्लक असें तों ज्ञान-प्राप्ति होणार नाहीं. हा मार्ग कलियुगाला साजेसा नाहीं.

"आपलें मन ज्या ठिकाणीं विहार करतें अशा सात पातळ्या वेदांनीं सांगितल्या आहेत. संसारविचारांत मन गुरफटलेलें असतें तोंवर तें अगदीं खालच्या तीन पातळ्यांवर असतें. नाभि, जननेंद्रिय आणि गुदस्थान या त्या तीन पातळ्या होत. या अवस्थेंत मन उच्च करण्यास असमर्थ असतें. तें सदोदित कामिनी कांचनाच्या चिंतनांत व्यग्र असतें. मनाची पातळी हृदयस्थानीं आहे. या ठिकाणीं मन असतांना माणसाला आध्यात्मिक जाणिवेचा पहिला प्रत्यय येतो. सभोंवार सर्वत्र प्रकाश दिसतो. हा दिव्य प्रकाश पाहतांच साधक आश्चर्यानें थक्क होऊन म्हणूं लागतो, 'हें काय आहे ? हें आहे तरी काय ?' त्याचें मन संसारांतील वस्तूंत उतरत नाहीं.

"मनाची पांचवी पातळी कंठस्थानीं आहे. या पातळीवर मन पोंचलें म्हणजे साधक सर्व अज्ञात आणि मोह यांपासून मुक्त होतो ईश्वराव्यतिरिक्त:इतर कशा-बद्दलहि बोलायला अथवा ऐकायला त्याला आवडत नाहीं. कोणी संसारांतल्या गोष्टी त्यांच्यासमोर बोलूं लागला तर तो तात्काळ तिथून उठून जातो.

श्री साईनाथ प्रसन्न

स्थापना ] खास लोकाश्रयाखालील [ १९२५

हरि महादेव वैद्य (रत्नागिरीकर)

सोनें, चांदी, मोती व जवाहिर

यांची लोकप्रिय पेढी

न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई

टे. नं. ६०३५१ GRAM: JEWELKING

"सहावी पातळी कपालस्थानीं आहे. या पातळीवर मन पोंचलें म्हणजे साधकाला अहोरात्र ईश्वरदर्शन नित्य घडत राहातें. पण तरीहि अहंकाराची पुसट छाया शिल्लक असते. ईश्वरस्वरूपाचें तें अतुल सौंदर्य दृष्टीस पडतांच माणूस प्रमत्त बनून त्या स्वरूपाला स्पर्श करण्यास त्याला मिठी मारण्यास धांवतो. पण तसें करण्यांत त्याला यश येत नाहीं कंदिलांतल्या दिव्यासारखें हें आहे. त्या दिव्याला स्पर्श करतां येईल असें वाटतें पण वरच्या कांचेमुळें तसें करतां येत नाहीं.

'मस्तकांत सातवी पातळी आहे. मन तिथें जाऊन पोंचलें म्हणजे माणसाची समाधि लागते. त्यावेळीं ब्रह्मज्ञानी ब्रह्माचा प्रत्यक्षानुभव घेतो. पण या अवस्थेंत त्याचें शरीर फार काळ टिकत नाहीं. त्याला बाह्य जगाचें भान उरत नाहीं. त्याच्या तोंडांत दूध घातलें तरी तें ओघळून तसेंच बाहेर येतें. या अवस्थेंत एकवीस दिवस राहिल्यावर तो देहत्याग करतो. ही ब्रह्मज्ञानाची स्थिति आहे. पण तुमचा मार्ग भक्तीचा आहे. व तोच चांगला आणि सुलभ आहे.

## कर्माचा बडिवार केव्हां संपतो

'एक दिवशीं एक माणूस मला म्हणाला 'महाराज ! मला तुम्ही चटकन् समाधि म्हणतात ती शिकवाल का?' (हंशा)

"समाधि प्राप्त झाल्यावर माणसाचीं सर्व कर्मे नष्ट होतात. जप, पूजा इत्यादि सर्व भक्तिपर प्रकार थांबतात. तसेंच त्याला सांसारिक कर्तव्य म्हणून कांहीं उरत नाहीं. प्रारंभीं कर्माचा बडिवार बराच असतो. माणूस ईश्वरप्राप्तीच्या मार्गावर जसजसा पुढें जातो तसतसा त्याचा कर्माचा बाह्य थाटमाट कमी कमी होऊं लागतो. इतका कीं त्याला परमेश्वराचें नामस्मरण वा कीर्तन करणेंहि अशक्य होतें. (शिवनाथाला उद्देशून) आमच्या बैठकीला जोंपर्यंत तूं इथें आला नव्हतास तोंपर्यंत लोक तुझ्याबद्दल खूप बोलत होते आणि सद्गुणांची प्रशंसा करीत होते. पण तूं इथें येतांक्षणींच ती सर्व चर्चा थांबली. आतां तुझ्या नुसत्या दर्शनानें लोकांना आनंद झाला. लोक आतां नुसतें म्हणतात, 'वा! हे शिवनाथ बाबू आले !' तुझ्याविषयींचें इतर सर्व बोलणें आतां थांबलें.

'समाधि सिद्ध झाल्यावर मी एकदां गंगेवर तर्पण करण्यासाठीं गेलों होतों. पण मी हातांत पाणी घेतलें मात्र, तें माझ्या बोटांतून सगळें ओघळून गेलें. रडत रडत मी हलधारीला म्हणालों, 'बाबा हें काय रे ?' हलधारी म्हणाला 'धर्मग्रंथांत याला 'गलितहस्त' म्हणतात.' ईश्वरदर्शनानंतर तर्पणासारखीं कर्मं आपोआप गळून पडतात.

'कीर्तनांत भक्त प्रमथ गात म्हणतो, 'निताइ आमार माता हाती'—माझा निताई मत्त हत्तीसारखा नाचतो. भक्तीचा रंग चढूं लागला म्हणजे तो नुसतें 'हाती हाती!' एवढेंच गातो. पुढें तर 'हाती' वरून नुसतें 'हा' एवढेंच उच्चारून त्याची ब्रह्मानंदी टाळी लागते. आतांपर्यंत सारखा गात असलेला माणूस आतां अगदीं स्तब्ध होतो.

'ब्राह्मणांना भोजन घातलें म्हणजे पंक्तीत सुरुवातीला पुष्कळ बोलण्याची गडबड चालू असते. पाहुणे पानावर बसले म्हणजे बरेंचसें बोलणें थांबतें

मग 'थोडी लुची आणा' अशासारखें एखाद दुसरें वाक्य तेवढें ऐकूं येतें. लुची व इतर पदार्थ खायला सुरुवात झाली कीं बहुतेक गडबड थांबते. शेवटीं पानावर दहीं वाढतात तेव्हां ते बोटांनीं खाण्याचा फक्त सुप् सुप् आवाज कायतो ऐकूं येतो. नंतर सगळी गडबड थांबतेच म्हणायला हरकत नाहीं. मागाहून सगळे वामकुक्षीसाठीं आडवे होतात आणि सर्वत्र संपूर्ण शांतता पसरते.

"म्हणून मी म्हणतों कीं धार्मिक जीवनाच्या सुरुवातीला माणूस कर्तव्याचा मोठा बाऊ करतो. परंतु ईश्वरचिंतनांत त्याचें मन अधिकाधिक रमलें कीं त्याची चळवळ कमी होते. अगदीं अखेरीस कर्मसंन्यास व तदुत्तर समाधि हीं येतात.


**१ महिन्यांत प्रॅक्टिकलसह वायरमन कोर्सः**—शिवाय रविवारच्या सहा महिन्याच्या बॅचेस् पाळी बदलणाऱ्या गिरणी–कामगारांना सोयीस्कर अशा सकाळ–संध्याकाळच्या मराठी, हिंदी व इंग्रजींतून वेगवेगळ्या बॅचेस्. भेटा किंवा लिहा :—

**दादर इलेक्ट्रिक इन्स्टिट्यूट**

**पोर्तुगीज चर्चशेजारी 'जे' रूट बस स्टॉपसमोर दादर (बी.बी.) मुंबई नं. २८**


"समाधि साध्य झाल्यावर सामान्यतः देह फार काळ टिकत नाहीं. याला फक्त नारदासारखे कांहीं महर्षी अपवाद आहेत. इतरांना धर्माचा प्रकाश दाखवावा यासाठींच त्यांनीं देह कायम ठेवला होता. चैतन्यासारखे जे ईश्वरावतार आहेत त्यांच्या बाबतींतहि असेंच आहे. विहीर खणून झाली म्हणजे माणूस बहुधा कुदळ–टोपली फेंकून देतो. परंतु कांहीं जण शेजाऱ्यांच्या उपयोगासाठीं हीं हत्यारें ठेवून देतात. समाधीनंतरहि देह कायम ठेवणारे महात्मे इतरांच्या दुःखांनीं कळवळत असतात. आपल्या स्वतःच्या साक्षात्कारानुभवानें ते स्वार्थी तृप्ति मानीत नाहींत. अप्पलपोट्यांच्या स्वभावाचा तुम्हांला अनुभव आहेच. एखाद्या विशिष्ट ठिकाणीं तुम्हीं त्यांना थुंकायला सांगितलेंत, तर त्यानें तुमचें कांहीं भलें होईल म्हणून तें तेवढेंसुद्धां करणार नाहींत. पैची मिठाई आणायला तुम्ही त्यांना सांगितलींत तर वाटेंत येतां येतां ती ते थोडी चाटून ठेवल्याखेरीज राहणार नाहींत. (सर्व हंसतात.)

'पण ईश्वरी शक्तीची अभिव्यक्ति निरनिराळ्या जीवांत निरनिराळ्या प्रकारें होत असते. सामान्य जीवांना दुसऱ्यांना शिकवण देण्याची भीति वाटते. एखादा निरुपयोगी लाकडाचा तुकडा जेमतेम पाण्यांत तरंगतो पण एखादा पक्षी त्यावर बसला तर तेवढ्या वजनानेंहि तो पाण्यांत बुडतो. पण नारदासारखे महर्षि हे जाडजूड व जड लांकडी ओंडक्यासारखे आहेत. हे स्वतः तर पाण्यांत तरंगतातच परंतु माणसें, गाई, हत्ती यानांहि ते पाण्यांतून नेऊं शकतात.

———

# शापांचें अघोरी सामर्थ्य !

निवेदक : दत्ता मराठे

प्राचीनकाळीं इजिप्तमधील लोक मृत माणसांना जाळून अथवा पुरून न टाकतां तीं प्रेतें नीट जतन करून ठेवीत असत. मृतांच्या देहांवर विशेष प्रकारचे संस्कार करून आणि ते दीर्घकाळ टिकावेत यासाठीं त्यांच्यामध्यें अनेक तऱ्हेचा औषधी मसाला भरून, नंतर ते देह शवपेटींत ठेवण्यांत येत असत. मृतांचे देह असे राखून ठेवण्यामागें त्या काळच्या कांहीं विशिष्ट कल्पना होत्या.

एक कारण असें कीं, त्या वेळच्या कांहीं धार्मिक विधींमध्यें प्रेतांचा वापर करण्यांत येत असे ! मेलेलें मूल—त्यांतहि जन्मजात मेलेलें मूल असलें तर त्याचें मांस कुटून त्याचा लगदा करीत आणि अंगांत वारें येणाऱ्या पुरोहिताचे मंत्रतंत्र-विषयक सामर्थ्य अधिक वाढावें यासाठीं त्याच्या सर्वांगाला हें कुटलेलें मांस फांशीत असत. असें मृत मुलाचें मांस फासलेलें असलें म्हणजे त्या पुरोहिताच्या आत्म्याला त्याच्या देहांतून बाहेर जाणें आणि परत त्या देहांत प्रवेश करणें हें अतिशय सुलभ जातें, अशी त्यावेळीं समजूत होती !

एकाकाळीं अशी कल्पना होती कीं अनेक वर्षांच्या अवधीनंतर, देह सोडून गेलेला आत्मा पुन्हा त्याच देहांत प्रवेश करतो. यासाठीं तो देह शक्य तितक्या चांगल्या अवस्थेंत टिकविणें आवश्यक आहे असें मानलें जात असे.

याहून अगदीं वेगळी अशीहि एक कल्पना होती. ती ही कीं, पृथ्वी सोडून गेलेल्या आत्म्याला परत पृथ्वीवर यायला आवडत नाहीं. आणि जोपर्यंत तो मृत देह जिवंतपणींसारखा टिकवून ठेवलेला असेल तोपर्यंत त्याचा आत्मा मुक्त राहील. यासाठींहि प्रेतें काळजीपूर्वक जतन करून ठेवलीं जात.

मृत माणसाच्या इतमामाला अनुसरून त्याच्या देहाच्या जतनावर खर्च करण्यांत येत असे. मृत देह शवपेटींत गुंडाळून ठेवण्याचें काम करणाऱ्या तज्ज्ञ माणसांचा एक खास वर्ग पूर्वी इजिप्तमध्यें अस्तित्वांत होता. अशा तज्ज्ञांच्या स्वाधीन तें प्रेत करण्यांत येई. हे कारागीर मृत देहांतील आंतडीं, मेंदू वगैरे बाहेर काढून खास तयार केलेल्या मातीच्या बरण्यांत भरीत. देहांतील हा भाग काढल्यामुळें तयार झालेली पोकळ जागा औषधी मसाले घालून भरून काढीत. त्यानंतर तो मृतदेह मिठाच्या पाण्यांत सत्तर दिवसपर्यंत बुडवून ठेवीत. सत्तर दिवस झाल्या-

वर तो देह बाहेर काढून त्याला गोंद लावून कापडाच्या पट्ट्यांत लपेटीत. आणि अशा रीतीनें लपेटून तयार झालेली मनुष्याकृति शवपेटीत ठेवून ती पेटी बंद करीत. मग ती शवपेटी व त्या देहाचे इतर भाग भरून ठेवलेल्या बरण्या वगैरे सर्व पिरॅमिडमध्यें बांधलेल्या खोलींत ठेवून ती खोली बंद करण्यांत येई.

अशा थडग्यांत ठेवलेले हे मृतदेह सुरक्षित राहावेत आणि त्यांना कोणी स्पर्श करूं नये यासाठीं कांहीं अघोरी विधि केले जात असत. एखादा थोर सरदार, राजा किंवा मोठा पुरोहित मरण पावला तर त्याच्या मृत देहाचें चिरंतन संरक्षण करण्यासाठीं कांहीं गुलाम कायमचे ठेवले जात असत. कसे ?

तो प्रकार मोठा भयविलक्षण आहे. एखादा थोर माणूस मरणाच्या दारीं पडला आहे असें दिसतांच, पुरोहित कांहीं विश्वासू गुलामांची निवड करी. त्या गुलामांचे नाना प्रकारांनीं अघोरी हाल केले जात ! अखेरीस त्या छळांनीं त्या गुलामांचें शरीर आणि मन हीं इतकीं दुबळीं होऊन जात कीं पुरोहित जें सांगेल त्याला तत्काळ होकार देण्याशिवाय त्यांना कसलीहि स्वतःची इच्छा, कल्पना किंवा शक्ति उरत नसे. या स्थितींत गुलामांची मनें संपूर्णतः सूचनाग्रहणशील ( सजेस्टिबल ) बनून जात असत. असें झालें कीं त्या गुलामांना एकच सूचना वारंवार दिली जात असे, 'मी अमुक राजाच्या देहाचें सतत रक्षण करीन. त्याला धक्का पोंचला तर मी विध्वंस माजवीन, नाश करीन !' या एका कल्पनेखेरीज दुसरी कोणतीहि कल्पना त्या गुलामांच्या मनांत शिल्लक राहणार नाहीं असें करण्यांत येई. ही एकमेव कल्पना—'मी अमक्या मृत देहाचें रक्षण करीन, कोणी आड आलें तर नाश करीन'—ही एकमेव कल्पना त्या गुलामांचें चित्त व्यापून राहिली आहे असें झालें म्हणजे त्यांच्या त्या तशा प्रकारच्या मनःस्थितींत त्यांना ठार मारण्यांत येई. मृत देहाचें रक्षण करण्याच्या एकच एक कल्पनेचा ध्यास घेतलेले गुलाम ठार केल्यावर त्यांचे आत्मे त्या विशिष्ट देहाचें रक्षण जागरूकपणें कायमचे करीत राहतात अशी कल्पना होती !

ही कल्पना वाचून तुम्हांला हंसूं येईल, पण जरा थांबा ! मी आतां यापुढें जी विलक्षण हकीकत सांगणार आहें ती नीट ऐका आणि मग आपलें काय तें मत बनवा.

ही लोकविलक्षण हकीकत राजा तुतनखामेन याच्या थडग्याबद्दलची आहे. इजिप्तमधील पिरॅमिड्स, त्यांखालील थडगीं, त्यांतील शवपेट्या यांचें उत्खनन करून त्यांवरून प्राचीन इजिप्शियन संस्कृतीबद्दल पुष्कळच माहिती संशोधकांनीं गोळा केली आहे. हीं थडगीं खोदणें आणि त्यांतील शवपेट्या बाहेर काढून त्या इतरत्र नेणें हें जिवाला धोका निर्माण करणारें आहे, अशी इजिप्तमधील लोकांची समजूत आहे. ही समजूत मूर्खपणाची आहे असें म्हणून संशोधकांनीं तिच्याकडे दुर्लक्ष केलें. परंतु अनेक थडग्यांबाबत कांहीं विलक्षण अनुभव आलेले आहेत. हे सारेच भयप्रद अनुभव केवळ योगायोग म्हणून उडवून लावतां

येण्यासारखे नाहींत. राजा तुतनखामेन याच्या थडग्याचें उत्खनन झाल्यावर कोणकोणत्या भयप्रद घटना घडल्या त्या तेवढ्याच पाहिल्या तरी प्राचीन इजिप्शियन पुरोहितांच्या शापमंत्रांचें सामर्थ्य समजून येण्यासारखें आहे.

राजा तुतनखामेन याचें थडगें तीन हजार वर्षांपूर्वीचें होतें. १९२० सालाच्या सुमारास उत्खननांत तें आढळलें, तेव्हां इजिप्शियन इतिहासाच्या संशोधकांना मोठा आनंद झाला. त्यानंतर घडून आलेल्या विचित्र घटना मात्र पाहण्यासारख्या आहेत.

राजा तुतनखामेन याच्या थडग्यांत ज्या अनेक जणांनीं प्रवेश केला होता त्यांमध्यें लॉर्ड कॅनरिव्हॉन हा एक होता. तें थडगें शोधून काढल्यानंतर थोड्याच दिवसांत लॉर्ड कॅनरिव्हॉन याला एक डांस चावला! डॉक्टरांनीं आपल्याकडून उपचारांची शिकस्त केली; पण या डांसाच्या दंशानें लॉर्ड कॅनरिव्हॉन हा मरण पावला. राजाच्या शवपेटीचें संरक्षण करणाऱ्या गुलामांच्या आत्म्यांनीं हा सूड उगवला, किंवा त्या राजाच्या पुरोहितांनीं त्या वेळीं राजाच्या देहाची विटंबना करणाऱ्यांना उद्देशून जी शापवाणी उच्चारली असेल तीच प्रभावी ठरली, असें इजिप्तमधील भाविकांचें बालंबाल मत होतें. या समजुतीचा दरारा एवढा होता कीं लेडी कॅनरिव्हॉन जेव्हां आपल्या पतीचें शव घेऊन स्वदेशीं जाण्यासाठीं कैरोहून बोटीनें निघाली, तेव्हां त्याच बोटीनें जाण्याचें ठरविलेल्या शेंकडों उतारूंनीं आपलीं तिकिटें आयत्या वेळीं रद्द केलीं!

कांहीं महिन्यांनीं लॉर्ड कॅनरिव्हॉनचा सावत्र भाऊ कर्नल ऑब्री हर्बर्ट हा लंडनमध्यें मरण पावला. हाहि त्या थडग्यांत शिरलेला होता, आणि त्यावेळीं—कां कोणास ठाऊक—तो एकदम असें म्हणाला होता कीं, 'आमच्या कुटुंबावर कांहींतरी भयानक आपत्ति कोसळणार आहे असें मला राहूनराहून वाटतें आहे!'

त्या राजा तुतनखामेनच्या 'शवाच्या शापाचा' तिसरा बळी म्हणजे जॉर्ज जे. गुल्ड

खास सर्वोत्कृष्ट निवडक कापडाचे नमुने
व हरतऱ्हेच्या डिझाइन्सचें कापड माफक
भावांत खरेदी करा

पी. मधुकर (क्लॉथ मर्चंटस)

बोरकर वाडी, रानडे रोड, दादर, मुंबई २८

हा होय. गुल्ड हा लॉर्ड कॅनरिव्हॉनचा जिवलग मित्र. त्या थडग्याचें उत्खनन चालू झालें तेव्हां प्रारंभीं तोहि त्या थडग्यांत शिरला होता. तो अकस्मात् मरण पावला आणि त्याला मरण कां आणि कसें आलें हें अखेरपर्यंत एक न उलगडलेलें गूढच राहिलें !

गुल्डच्या रहस्यमय मृत्यूनंतर कांहीं महिन्यांनीं १९२४ सालीं सर अर्चिबाल्ड डग्लस रेड या क्ष-किरणतज्ज्ञाला उत्खनन-संशोधकांनीं तुतनखामेनच्या 'ममी'चे —शवपेटीचे—क्ष-किरण फोटो घेण्याची कामगिरी सांगितली. हे फोटो घेण्याच्या वेळींच त्याला एकदम बरें वाटेनासें झालें. तें काम अर्धवट टाकून तो जाऊन जो बिछान्यावर पडला, तो आजारानें बिछान्यालाच खिळला. त्याला नेमका कोणता रोग झाला आहे हें डॉक्टरांना समजलेंच नाहीं. त्या रहस्यमय आजारानें थोड्याच दिवसांत तो मरण पावला.

या घटनेनंतर एका महिन्यानें आणखी एका प्रसिद्ध शास्त्रज्ञाला आकस्मिक मृत्यु आला. कॉलेज द फ्रान्सचा प्रोफेसर पॉल कॅसानोव्हा यानें तुतनखामेनच्या कबरस्थानाचें अधिक उत्खनन चालू केलें होतें. या उत्खननाच्या कामावर असतांनाच त्याला मरण आलें. मरणाचें कारण समजलें नाहीं ! दुसरें कांहीं कारण सांगतां येईना, म्हणून डॉक्टरांनीं 'हृदयविकार' हें निदान केलें होतें !

इजिप्शियन इतिहासाचा व समाज-संस्कृतीचा सखोल व्यासंग असलेला विद्वान् श्री. एच. जी. ईव्हिलिन-व्हाइट यानें यानंतर थोड्याच दिवसांत आत्महत्या केली. त्या वेळीं लिहून ठेवलेल्या पत्रांत त्यानें म्हटलें होतें,—

"मला शाप मिळालेला आहे हें मला समजलें होतें."

यानंतरचा बळी म्हणजे एक वजनदार व श्रीमंत इजिप्शियन सरदार राजा अली फहामी बे हा होय. तुतनखामेनच्या थडग्याच्या उत्खननाला यानें आर्थिक साहाय्य दिलें होतें व तो स्वतः थडग्यांत जाऊन आला होता. हा प्रसंग तो मागाहून विसरूनहि गेला असेल. त्याला थोड्याच दिवसांत एक सुस्वरूप फ्रेंच तरुणी भेटली. दोघांनीं लग्न केलें. पण नंतर तो लवकरच तिला शिवीगाळ करूं लागला. एका रात्रीं त्यांचें कडाक्याचें भांडण झालें, आणि तिनें बेला गोळी घालून ठार केलें ! बे मेला; पण या खुनाच्या खटल्यांतून ती फ्रेंच तरुणी मात्र दोषमुक्त होऊन सुटली !

अली बे यांच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांत त्याचा खाजगी चिटणीस अल्लाह बेन एकाएकीं मरण पावला ! त्याच्या मृत्यूचें कारण अखेरपर्यंत अज्ञातच राहिलें. यानेंहि तुतेनखामेनच्या थडग्याला भेट दिलेली होती !

दोन वर्षें गेलीं. शहाच्या शापाचें भय ओसरूं लागलें होतें. तोंच प्रो. जॉर्ज बेनेडाइट हा अकस्मात् मृत्युमुखी पडला ! तुतनखामेनच्या कबरस्थानाचें उत्खनन करण्यासाठीं जी संशोधकाची टोळी गेलेली होती त्या टोळींत हा होता.

प्रो. बेनेडाइट हा १९२६ च्या मार्च महिन्यांत मरण पावला. त्यानंतर १९२९ पर्यंत उल्लेखनीय आपत्ति घडली नाहीं. १९२९ सालीं शिकागोला इन्व्हिलिन बॅडिंग्टन ग्रीली नांवाची श्रीमंत स्त्री आली. या स्त्रीने तुतनखामेनच्या थडग्याला भेट दिलेली होती. लार्ड कॅनरिव्हॉन याची ती मैत्रीण. शिकागोला आल्यावर एकदां रस्ता ओलांडतांना जॉन मायर नांवाच्या पोलिसाशीं ती दोन शब्द बोलली. काय झालें कुणास ठाऊक; तिला या सामान्य पोलिसाबद्दल कमालीचें आकर्षण उत्पन्न झालें! दुसऱ्या दिवशीं तिनें त्याला जेवणाचें निमंत्रण दिलें. तिला त्या पोलिसाबद्दल प्रेम वाटूं लागलें होतें; पण त्या पोलिसाला ही एक श्रीमंत बाई आहे यापलीकडे कांहींच वाटत नव्हतें. तिनें त्याला आपल्याबरोबर लग्न करण्याची गळ घातली; पण त्याचें आधींच लग्न झालें होतें व त्याला दोन मुलेंहि होतीं. या श्रीमंत बाईला काय वेडबीड लागलें आहे कीं काय असें त्याला वाटूं लागलें.

कांहीं दिवसांनीं या बाईने आपल्या सुसज्ज निवासस्थानांत बसून दोन पत्रें लिहिलीं. एका पत्रांत तिनें त्या पोलिसाबद्दलची आपली प्रेमभावना व्यक्त केली होती. दुसरें पत्र असें होतें,—

'मी पाप केलें आहे. अत्यंत वेदनामय नरकयातना मी भोगल्या आहेत हें देवाला ठाऊक आहे. गेलीं कित्येक वर्षें या यातनांनीं माझा छळ होत असतांना मी सारखी मृत्यूची मार्गप्रतीक्षा करीत राहिलें आहे.'

हीं पत्रें लिहून ठेवून आपल्या कपाळावर पिस्तुल झाडून घेऊन तिनें आत्महत्या केली!

या आत्महत्येनंतर थोड्याच दिवसांत लंडनमध्यें ऑनरेबल रिचर्ड बेथेल हा आपल्या निवासस्थानीं गूढ रीतीनें मरण पावलेला आढळला. बेथेल हा तुतनखामेनच्या उत्खनन-मोहिमेंतील प्रमुखाचा चिटणीस होता.

रिचर्ड बेथेल हा ज्याचा वारस तो लॉर्ड वेस्टबरी सेंट जेम्स कोर्टमधील आपल्या जागेच्या खिडकींतून खालीं पडून मरण पावला. बेथेलच्या मृत्यूनें त्याची मनःस्थिति अतिशय विषण्ण बनलेली होती.

एवढ्यानेंच झालें नाहीं. लॉर्ड वेस्टबरीचें शव ज्या गाडींतून स्मशानाकडे नेण्यांत येत होतें, त्या घोड्याचा धक्का लागून वाटेंत एका आठ वर्षांच्या मुलाला अपघाती मरण आलें!

तुतनखामेनचें थडगें खोदल्यावर त्याचें निरीक्षण करण्यासाठीं सहा फ्रेंच लेखक आणि पत्रकार यांना निमंत्रण देण्यांत आलें होतें. त्या सर्वांना आकस्मिक मृत्यु आले! त्या थडग्याचें उत्खनन आणि निरीक्षण यांत भाग घेतलेल्या एकूण २१ जणांना अकस्मात् अपघाती रहस्यमय मृत्यु आले!

हे सर्व योगायोगच म्हणायचे असतील तर म्हणा! परंतु लोकभ्रम न मानणाऱ्या अशा अनेक विद्वानांचेंहि असें मत आहे कीं, हजारों वर्षांपूर्वी शवांच्या रक्षणार्थ इजिप्शियन पुरोहितांनीं उच्चारलेल्या शापांमध्यें आजहि कांहींतरी विलक्षण प्रकारचें अघोरी सामर्थ्य आहे!

**( मासिक मोहिनीवरून )**

# वंदु वंदु या सांइ–मूर्तिला

[ चाल : सांइ होउं दे अपुलि चाकरी,
राग : ललत, ताल : त्रिताल ]

वंदु वंदु या सांइ–मूर्तिला ।
रजत आसनें विभूषिलेल्या ॥ ध्रु० ॥
तेवति नंदादिप दो बाजू ।
तीर्थ पुजेचें सर्वां पाजूं ।
मिळे प्रसादा संत्री काजू ।
वर्णूं सांइ, बसत जी शिला ॥ १ ॥
करीं घेउनी ती पंचारती ।
म्हणे दिगंबर मधुर आरती ।
साथ सनइची बाळा हातीं ।
ऐका अप्पा ललकारीला ॥ २ ॥
संतू नाना भागवतादी ।
शिस्त लावण्या, येऊं नका मधीं
चोपदार ते सांगति भक्तां ।
गर्दी होई उदि घेण्याला ॥ ३ ॥
विठ्ठलरावांचा आवाज ।
ना करि कोणा कधिं नाराज ।
अनंत विठ्ठल औटि ओगले ।
घालिति रुद्रानें स्नानाला ॥ ४ ॥
उद्धवाच्या पाहुनि मौना ।
आरति पर्यंताच्या दमना ।
लालाजीच्या गीता पठणा ।
शिकविति हितकर नियम तनूला ॥ ५ ॥
मातापितरांची पुण्याई ।
म्हणुनि आणिसी तुझिया पायीं ।
नलिनी भरत श्रीरामासह ।
होत राहुं दे शिरडी वारीला ॥ ६ ॥

— बाबांच्या बाळाचें बाळ

# भाद्रपदांतील सण

## हरितालिका

हरितालिका हा सण नसून तें एक कौटुंबिक व्रत आहे. याच्या उत्पत्तीसंबंधीं पुराणांत पुढील कथा आहे—

पूर्वी एकदां पर्वतराजाची कन्या पार्वती ही उपवर झाली आणि नारदाच्या सल्यानें तिच्या पित्यानें तिला विष्णूला देण्याचा बेत केला. परंतु पार्वतीच्या मनांतून शंकरास वरावें असें होतें. तिनें आपल्या सखीकडून पित्यास असा निरोप पाठविला कीं, 'तुम्ही मला विष्णूच्या पदरीं बांधल्यास मी प्राणत्याग करीन.' इतक्यावरच ती थांबली नाहीं. तिनें आपल्या सखीशीं मसलत करून घरांतून पळून जाण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें ती एका अरण्यांत जाऊन तेथें शिवाचा लाभ व्हावा यासाठीं शिवलिंगाची पूजा करूं लागली. कालेंकरून तिला शिव प्रसन्न झाला व त्यानें तिला वरिलें. तिनें जें व्रत आचरिलें त्याच प्रकारच्या व्रताचरणानें इच्छित वर प्राप्त होईल, या हेतूनें हरितालिकागौरी या नांवानें सखीसह गौरीची पूजा केली जाते.

## गणेशचतुर्थी

गणपतीचा वार्षिक महोत्सव भाद्रपद शु. चतुर्थीस साजरा होतो. प्रत्येक महिन्यांतील शुक्ल चतुर्थी ही सिद्धिविनायकी या नांवानें प्रसिद्ध असून भाद्रपद शु. चतुर्थी ही महासिद्धि विनायकी होय. कृष्णपक्षांतील चतुर्थीस संकष्ट चतुर्थी हें नांव आहे. ही तिथि मंगळवारीं आल्यास तिला अंगारकी संकष्ट चतुर्थी म्हणतात. या दिवशीं चंद्रोदयीं गणपतीची पूजा केल्यानें सर्व प्रकारच्या संकटांचा परिहार होतो, अशी भाविकांची समजूत आहे. श्रावण व माघांतील अंगारकी विशेष श्रेष्ठ मानतात.

गणपती—पूजनाचा शास्त्रोक्त विधि असा:—

भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गणपतीची मृत्तिकेची प्रतिमा पूजावी. या देवतेला दूर्वा व मोदक फार प्रिय असल्यानें ते समर्पण करावे. भजन पूजनानें त्याला संतुष्ट करावें. दीड, पांच, सात, दहा किंवा एकवीस दिवसांनीं प्रतिमेचें विसर्जन करावें. उत्तर पूजेनंतर प्रतिमा जलांत विसर्जन करावी.

## आध्यात्मिक अर्थ

गणपति हा प्रणवस्वरूप असल्याचें गणेशपुराणांत सांगितलें आहे. ज्ञानेश्वरींत गणेशस्तवन करतांना ज्ञानदेवांनीं म्हटलें आहे—

**अकार चरण युगल ।**
**उकार उदर विशाल ॥**
**मकार महामंडल ।**
**मस्तकाकार ॥**

चतुर्थीला गणपति–पूजन कां ? चतुर्थ अथवा तुर्यावस्थेंत परमात्म्याचा साक्षात्कार होतो. त्या दिवशीं चंद्रदर्शन करूं नये असें म्हटलेलें आहे. चंद्र ही मनाची देवता असून मन चंचल आहे. चंद्रदर्शन न घेणें म्हणजे मनोलय करणें होय. गणपतीचें वाहन जो उंदीर तो कालस्वरूप आहे. उंदीर ज्याप्रमाणें पदार्थ कुरतडीत असतो त्याचप्रमाणें कालहि सृष्ट पदार्थांचा सारखा नाश करीत आहे. या कालालाच ज्यानें जिंकून आपलें वाहन बनविलें तो भूतमात्रांचा पति गणराज श्रेष्ठ होय, असें या देवतेचें तात्त्विक वर्णन आहे

## ऋषिपंचमी

ऋषिपंचमी हा सण नसून तें व्रत आहे. स्त्रिया तें पाळतात. भाद्रपद शु. पंचमीला स्त्रिया ऋषींची मनोभावें पूजा करतात.

या व्रतासंबंधींच्या कथा विलक्षण आहेत. एक कथा अशी—

विदर्भ देशीं सुमित्र नांवाचा ब्राह्मण होता. त्याच्या पत्नीनें रजस्वला असतां घरांत विटाळ कालविल्यामुळें उभयतां पतिपत्नींस अनुक्रमें कुत्र्याचा, बैलांचा व किड्यांचा जन्म प्राप्त झाला. पुढें तें दांपत्य सप्तर्षींच्या पूजनानें उद्धरून गेलें.

या व्रताचा शास्त्रोक्तविधि असा—

माध्यान्हकालीं नदी, तलाव किंवा विहीर अशा एखाद्या जलाशयाजवळ जाऊन या व्रतासंबंधीं संकल्प केल्यावर पंचगव्य प्राशन करावें. आघाड्याच्या समिधेनें दंतधावन करून सौभाग्यवती स्त्रीनें हळद व विधवेनें गोमय लावावें व थंड पाण्यानें स्नान करावें. याप्रमाणें १०८ वेळां स्नान झाल्यावर पाटावर सप्तर्षींच्या स्थानीं सात सुपाऱ्या मांडून त्यांची पूजा करावी. ब्राह्मणास वायन व दक्षिणा द्यावी. ऋषींची कथा श्रवण करावी. या पंचमीच्या दिवशीं फक्त कंदमुळांवर राहावें. बैलाच्या श्रमानें पैदा झालेले जिन्नस वापरूं नयेत. याप्रमाणें सात वर्षें हें व्रत पाळल्यावर वर कथन केलेलें पाप नाहींसें होतें.

## ज्येष्ठा-गौरी

भाद्रपद शुक्ल पक्षांतील अनुराधा नक्षत्रावर गौरीचें आवाहन, ज्येष्ठा नक्षत्रावर पूजन व मूळ नक्षत्रावर विसर्जन करण्याचा संप्रदाय महाराष्ट्रांत आहे. बहुधा भाद्रपद शु. अष्टमीस हा उत्सव होत असतो. या तिथीस दुर्वाष्टमी असेंहि म्हणतात. गौरीबरोबर गणपति-विसर्जन करण्याची चाल अनेक ठिकाणीं आहे.

## वामनद्वादशी

दशावतारांतील पांचवा अवतार वामन. याच्या नांवानें भाद्रपद शु. द्वादशी पाळतात. या दिवशीं उपोषित राहून माध्यान्हकालीं श्रीवामनाची पूजा करावी. रात्रीं त्याची अवतारकथा वाचावी. त्याची पंचोपचारें पूजा केल्यावर ब्राह्मणास दान द्यावें. दहीं व दूध घालून भांड्याचें शिंकाळें, छत्री, उपानह वगैरे दान द्यावें व ब्राह्मणास पंक्तीस घेऊन भोजन करावें. महाराष्ट्रांत कांहीं वैष्णव संप्रदायी ब्राह्मणांत मात्र हा सण रूढ आहे. मलबारांत हा उत्सव अत्यंत प्रेक्षणीय होतो. तिकडे यास ओनम् असें नांव आहे.

## अनंतचतुर्दशी

हा सण नसून तें एक काम्यव्रत आहे. कुलाचार अथवा संकल्प असेल तरच तें आचरतात. याचा विधि असा—

माध्यान्हीं सुशोभित मंडपांत शुद्ध पाण्यानें भरलेला ताम्रकलश स्थापन करावा. त्यास दोन पंच बांधावे व त्यावर दर्भांचा शेष तयार करून ठेवावा. कलशा-वरील पूर्णपात्रांत मोहिनीसहित अनंताची प्रतिमा किंवा शालिग्राम स्थापन करून त्याची षोडशोपचारें पूजा करावी. तसेंच चौदा ग्रंथींनीयुक्त रेशमी दोऱ्याची पूजा करावी. रात्रौ नृत्य, गीत, वाद्य, कथा-श्रवण वगैरेंच्या योगानें अनंताची सेवा करून पूजा आटोपल्यावर ब्राह्मणांस पक्वान्नाचें वायन द्यावें. याप्रमाणें चौदा वर्षें केल्यावर इच्छित हेतु तडीस जातात.

---

# भक्तीनें भरलेला सँड-पेपर !

केरळमध्यें कान्हनगड येथें आनंदाश्रम नांवाचा एक आश्रम असून स्वामी रामदास नांवाचे एक महान् साक्षात्कारी संत तेथें राहतात. आश्रमांत स्वामीजींना सर्वजण 'पपा' या नांवानेंच हांक मारतात. पपा स्वभावानें अत्यंत खेळकर आणि संभाषणांत अतिशय विनोदी आहेत. ते गोष्टी सांगूं लागले म्हणजे श्रोत्यांत हास्याचीं कारंजीं सारखीं फुटूं लागतात आणि आणि तासन्तास केव्हां निघून जातात हें कळतहि नाहीं. स्वामीजी आपला उल्लेख चुकूनहि 'मी' या सर्वनामानें करीत नाहींत. तृतीयपुरुषीं रामदास या नांवानेंच ते स्वतःचा सदैव उल्लेख करतात.

एकदां निरनिराळ्या भक्तांच्या सेवेच्या तऱ्हांचें वर्णन करतांना स्वामीजी म्हणाले,—

'एकदां इथं आश्रमांत एक वृद्ध महाराष्ट्रीय माता आली होती. रामदास स्वस्थ बसलेला असतांना ही माता तिथं येऊन म्हणाली, 'पपा, मी आपले पाय जरा चेपूं का ?' रामदासनं तिचा भक्ति-भाव पाहून 'हो' म्हटलं. बराच वेळ रामदासाचे दोन्ही पाय गुडघ्यांपर्यंत तिनं चोळून चेपले. ही माता अत्यंत गरीब स्थितींतली होती. दहाघरचीं कष्टाचीं कामं करून ती आपली गुजराण करीत असे. कामाच्या कष्टांनीं तिचे हात खर-खरीत झालेले होते. बराच वेळ तिनें पाय चेपल्यावर रामदासनं तिला 'पुरे' म्हणून सांगितलं. पपांनी आपल्याकडून सेवा घेतली, या भावनेनं कृतकृत्य होऊन ती माता नंतर उठून गेली. ती गेल्यावर रामदासनं हळूच वांकून खालीं पाहिलं. तों काय !—रामदासच्या पोटऱ्यांवरचे केंस गळून खालीं जमिनीवर पडलेले होते ! त्या मातेचा हात म्हणजे एक नंब-रचा सँड-पेपर होता !'

ही गोष्ट ऐकून श्रोते हंसले. पण एक भक्त म्हणाला, "पपा, तिच्या खरखरीत हातांनीं तुमचे पाय सोलून निघत होते तर तिचं पाय चेपणं तुम्ही ताबडतोब थांबवलं कां नाहीं ?"

यावर स्वामीजी ताडकन् म्हणाले,—

"छे छे ! हात खरखरीत असले म्हणून काय झालं ? त्या माउलीच्या अंतःकरणांत केवढं प्रेम होतं ! किती भक्ति भरलेली होती !"

---

# * वाचा आणि विचार करा *

— संकलकः—संत–चरण–रज —

## क्षमेचें श्रेष्ठत्व

### धर्मराज युधिष्ठिर सांगतात—

क्षमा धर्म आहे, क्षमा यज्ञ आहे क्षमा स्वाध्याय आहे. जो मनुष्य क्षमेच्या सर्वोत्कृष्ट स्वरूपाला जाणतो तोच क्षमा करूं शकतो. क्षमा तप आहे, क्षमा पावित्र्य आहे आणि क्षमेनें जगताला धरून ठेवलें आहे. याज्ञिकानां वेदज्ञांना व तपस्व्यांना जें अंतिम स्थान मिळतें त्याच्याहि वरचें स्थान क्षमावंतांना मिळतें. क्षमा तेजस्वीयांचें ब्रह्म आहे व सत्यवंतांचें सत्य आहे. क्षमा हाच लोकोपकार व क्षमा हीच शांति आहे अशा क्षमेचा त्याग कोण बरें करील?

## पुण्यात्मा कोणाला म्हणतात?

### राजा महीरथ सांगतात—

जो चंदनवृक्षासमान दुसऱ्याचा ताप दूर करून त्याला प्रसन्न करतो व त्याच-प्रमाणें जो परोपकारार्थ स्वतः कष्ट करतो तो पुण्यात्मा होय. जगांत तोच खरा पुण्यात्मा आहे, की जो रंजलेल्या व गांज-लेल्या जीवाची पीडा नष्ट करीत असतांना, आपल्या प्रिय प्राणाचीही पर्वा करीत नाहीं. एकंदरींत, दुसऱ्याच्या सुखानें सुखी होणारे व दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी होणारे पुरुषच खरे पुण्यात्मे होत.

## प्रार्थना

### मुनिवर कण्डु प्रार्थना करितात—

हे जगन्नाथ! हा संसार अत्यंत दुस्तर व रोमांचकारी आहे. या संसारामध्यें दुःखाचें आधिक्य आहे हा अनित्य व केळ्याच्या पानाप्रमाणें सारहीन आहे. हा पाण्याच्या बुडबुड्यांप्रमाणें चंचल आहे. या संसारामध्यें सर्व प्रकारचा उपद्रव भरलेला आहे. मी तुझ्या मायेनें मोहित होऊन चिरकाल या संसारांत भटकत आहें. परंतु शांतीचा लवलेश नाहीं. माझें मन विषयासक्त आहे. देवेश! या संसा-राच्या भयानें त्रस्त होऊन आज मी तुला सर्वस्वी शरण आलों आहें. हे श्रीकृष्ण! या भवसागरांतून माझा उद्धार कर. हे सुरेश्वर! मी तुझ्या कृपेनें तुझेंच सनातन परमपद प्राप्त करण्याची इच्छा बाळगतों कीं जेथें गेल्यानंतर पुन्हां या महाभयंकर संसारांत येणे न लगे.

## सत्पुरुषाचा सत्संग

### सती सावित्री उपदेश करते—

सत्पुरुषांची वृत्ति निरंतर सद्धर्मा-मध्येंच राहत असते. ते कधीं दुःखी व

व्यथित होत नाहींत. सत्पुरुष सत्याच्या बळानें सूर्याशींही सान्निध्य करितात. व भूत–भविष्याच्या पलीकडे गेलेले असतात. सनातन सदाचार, हीच सत्पुरुषांची समाजसेवा व त्या सेवे-मधूनच सत्पुरुष परोपकार करीत असतात, आणि ते प्रत्युपकाराची कधींच इच्छा करीत नाहींत. अशा सत्पुरुषाचा एका वेळेचा सत्संगही अत्यंत इष्ट असतो व मानवाचें कोटकल्याण होते.

## साधकांस उपदेश

### श्री उडिया स्वामीजी उपदेश करतात—

स्वतःस सर्वांत लहान समजणें, अहं-कार न बाळगणें, कोणामध्येंही दोष न पाहाणें, कोणाचाहि मत्सर न करणें, अनावश्यक न बोलणें, सदा सत्य व नम्र बोलणें, यथासाध्य इतरेजनांची सेवा करणें, दीनावर दया करणें, विवाह–उत्सव आदि जनसमूहांत कमी सामील होणें, पापाचरणापासून फार दूर दूर राहाणें व ईश्वरावर पूर्ण विश्वास राखणें हे साधकांचे अत्यावश्यक गुण आहेत.

## मी कोण ?

### संत श्रीरामानंदजी सांगतात—

मानवहो ! विश्वासानें श्रीचरणांवर मस्तक ठेवा. प्रत्येक अवस्थेमध्यें ईश्वरे-च्छेचा नम्रतेनें स्वीकार करून प्रसन्नचित्त रहा. हीच शरणागति व समर्पण आहे. एकचित्तानें ध्यान करा–मी शक्तिमय, ज्ञानमय, आनंदमय व मंगलमय आहे. राम अनंत शक्तिमय, अनंत ज्ञानमय, अनंत आनंदमय व अनंत मंगलमय आहे ! मी राममय आहें. अमृतमय आहें !

---

मार्च १९५८ पर्यंत S. S. C. पास झालेल्या विद्यार्थिनींना
तीन वर्षांत बी. ए. होण्याची अद्यापहि शेवटची संधी.
F. Y. A. नवीन बॅच १ सप्टेंबरपासून सुरू
**पिंगेज क्लासेस**
बिस्मिल्ला बिल्डिंग, दादर, वे. रे. समोर




## जुलै १९५९

चालू महिन्यांत शिर्डी येथें बरीच भक्त मंडळी आली. याचे कारण श्रीगुरुपौर्णिमा उत्सव व शिर्डी येथें सात जिल्ह्यांचें कॉंग्रेस शिबीर भरले होते हे होय.

श्रीमंदिरांत कांहीं कलाकार व पंडित यांचे कार्यक्रम झाले, ते खालीलप्रमाणें—

**कीर्तन :** श्री. ह. भ. प. गौतमबुवा पाठक, नाशिक, श्रीमती गंगाबाई देशमुख नासिक. श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने, पुणें. श्री. श्री. बा. ऊर्फ बाबुराव देव, ठाणे. सं. गवई. श्री. मराठे.

**प्रवचन :** श्री. ज्ञानानंद स्वामी, श्रीरामपूर.

**गायन :** कु. चारुलता पांडे, पुणें. श्री. मोहन बोरकर, मुंबई. श्री. विनायक काळे, दादर मुंबई. श्री. राम बाबलो, गोवा, श्री. रमेश मेहता, श्री. गजानन शास्त्री जोशी अंजनवलीकर, श्री. अजमत हुसेन खॉं.

**वादन :** श्री. लालजी पाठारे, पुणें. ( तबला वादन ) श्री. नागोराव जाधव, औरंगाबाद ( तबलावादन. )

आषाढ शु॥ ११ महा एकादशी निमित्त श्रींच्या पालखीची गांवांतून मिरवणूक निघाली. भजन, कीर्तन वगैरे कार्यक्रम झाले.

ता. २६–७–५९ व ता. २७।७।५९ या रोजी शिर्डी येथें सात जिल्ह्यांचे कॉं. शिबिर भरले होतें. त्या निमित्तानें श्रीसाईबाबांचे दर्शनास खालीलप्रमाणें थोर थोर पुढारी मंडळी आली होती. मुंबईचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण व सौ. वेणूबाई चव्हाण. श्री. बाळासाहेब भारदे, राजे मालोजीराव नाईक निंबाळकर श्री. ठाकूरभाई देसाई, श्री. मधुकरराव चौधरी, श्री. वि. स. पागे, श्री. तुळशीदास जाधव, श्री. साठे, श्री. शामराव पाटील, श्री. वसंतराव नाईक.

## श्रीगुरुपौर्णिमा उत्सव, शिर्डी शके १८८१

श्रीचिदानंद सद्गुरु साईबाबा महाराज मु॥ शिर्डी, ता. कोपरगांव–जिल्हा अ. नगर यांचा गुरुपौर्णिमा उत्सव सालाबादप्रमाणें झाला. उत्सवास मुंबई, पुणें, सोलापूर, वराड, खानदेश, मराठवाडा, नागपूर, मद्रास, वगैरे ठिकाणांहून बरेच भक्तलोक आपले कुटुंबांतील मंडळीसह श्रीसाईबाबांचे दर्शनासाठीं आले होते.


उत्सवास प्रारंभ मिति आषाढ शु॥ १४, ता. १९।७।५९ रविवार रोजीं होऊन

मिती आषाढ व॥ १ ता. २१।७।५९ मंगळवार रोजीं उत्सव समाप्त झाला. असा तीन दिवसांचा उत्सव यांत मुख्य दिवस पौर्णिमेचा सोमवार ता. २०।७।५९ हा होय. या दिवशीं सबंध दिवस–रात्र श्रींचे समाधी मंदिर भक्तगणांनीं फुलून गेलें होतें. श्रींचे समाधीवर फुलांच्या माळांचा प्रचंड ढीग पडत असे, तो वरचेवर काढून टाकावा लागत असे. श्रींचे मूर्तीमागील चांदीचें सिंहासन समाधी-कठड्यावरील चांदीनें मढविलेले खांब वगैरे मुद्दाम पॉलिश करून स्वच्छ करविल्यामुळें जास्त चमकत होते. तीन दिवस बाहेर पाऊस मधून मधून पडत असे. पावसामुळें बाहेर घातलेल्या मंडपांतून कार्यक्रम करतां आला नाहीं.

**उत्सवाचा कार्यक्रम :** रविवार ता. १९–७–५९ रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त पहाटे ६ वाजल्यापासून सोमवार पहाटे ६ वाजेपर्यंत म्हणजे २४ तास श्रींचे द्वारकामाईत अखंड साईनामगजर टाळवीणा, मृदंगघोष व श्रीसाईसच्चरित्र ग्रंथ पारायण चालू होतें. या कार्यक्रमांत बऱ्याच स्त्री पुरुष भक्तमंडळींनी व संस्थानचे चालक मंडळींनीं भाग घेतला होता. श्रींचे कपड्यांची विक्रीही झाली. दोनप्रहरीं ४ ते ६॥ पर्यंत श्रींचे सभामंडपात श्री. ह. भ. प. गौतमबुवा पाठक नाशिककर यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. रात्रौ श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक काढण्यांत आली होती.

ता. २०।७।५९ सोमवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांच्या पूजा, अभिषेक, अर्चन वगैरे सामुदायिक पद्धतीनुसार करणेत आलें. १० ते १२॥ पर्यंत श्री. ह. भ. प. गौतमबुवा नाशिककर यांचे 'गुरुपौर्णिमेचें वैशिष्ट्य काय' या विषयावर सुश्राव्य कीर्तन झालें. दुपारीं ४ ते ७॥ पर्यंत श्रींचे जुने कापडांची विक्री भक्तांना प्रसाद म्हणून करणेत आली. रात्रौ श्रींचे रथाची मिरवणूक गांवांतून काढण्यांत आली. रात्रभर श्रीमंदिरांत विविध कलाकारांचे मनोहर कार्यक्रम चालू होते. या कार्यक्रमांत छत्तीस कलाकारांनीं भाग घेतला होता.

ता. २१–७ रोजीं नित्यकार्यक्रमांखेरीज संस्थान गवई मराठे यांचे गोपाळकाला कीर्तन, दहीहंडी वगैरे कार्यक्रम होऊन उत्सव समाप्त झाला.



## —: श्री साई बाबा :—

# शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें


| | | | | रु. न.पैसे |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत | ७—०० |
| (२) | ,, | (इंग्रजी) | ,, | ४—०० |
| (३) | ,, | (हिंदी) | ,, | ४—५० |
| (४) | ,, | (गुजराती) | ,, | ३—७५ |
| (५) | दासगणूकृत श्रीसाईनाथ–स्तवनमंजरी | | ,, | ०—१२ |
| (६) | ,, | (अध्याय ४) | ,, | ०—५० |
| (७) | सगुणोपासना | (मराठी) | ,, | ०—२५ |
| (८) | सगुणोपासना | (गुजराती) | ,, | ०—२५ |
| (९) | प्रधानकृत पुस्तक (A glimpse of Indian spirituality) | | ,, | १—०० |
| (१०) | श्रीसाई–लीलामृत | | ,, | २—०० |
| (११) | श्री साई–सुमनांजली | | ,, | ०—०६ |
| (१२) | कीर्तन–पंचक (श्री साईलीलांनीं नटलेलें) | | ,, | १—५० |
| (१३) | शीलधी | (शिरडी वर्णन) | ,, | ०—७५ |
| (१४) | श्रीसाईबाबा–अवतार व कार्य | | ,, | २—०० |
| (१५) | श्रीसाई गीतांजली | | ,, | ०—१२ |
| (१६) | रुद्राध्याय | | ,, | ०—१२ |

### वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान,
पोस्ट–शिरडी जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिसः ईस्ट अँड
वेस्ट इं. कंपनी बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई १

पोस्टेज निराळें. व्ही. पी. पद्धत नाहीं.





तारेचा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनीयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांस खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्यावर लिहा:—

**सुपरिटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद १३. ( आंध्र प्रदेश )**







★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते !

★


आ णि म्ह णू न च
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनीं तयार केलेले श्री साईबाबांचें तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री. सगुण मेरु नाईक
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर


मुद्रक : कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : ना. अं. सावंत, ईस्ट ॲन्ड वेस्ट
इन्शुअरन्स बिल्डिंग, ४१/५५, आपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.